— DEVELOPED NATIONS —

# डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज

▪ PRGI No. : MHMUL/25/A0594

Journalism for justice

♦ वर्ष १ ♦ अंक : ३ ♦ साप्ताहिक ♦ पुणे, शनिवार, दि. २९ ऑगस्ट ते शुक्रवार दि. ०४ सप्टेंबर २०२६ ♦ पाने : १२ ♦ स्वागत मूल्य : १० रु.

अंक व जाहिरातींसाठी : ९९२२४१२४५१

## विशेष संपादकीय

### महसूल न्यायालयांचे स्वतंत्र न्यायिक दालन-काळाची गरज

भारतीय संविधानाचे अनुच्छेद ५० स्पष्ट शब्दांत सांगते की, लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी न्यायव्यवस्था आणि कार्यकारी व्यवस्था (Executive and Judiciary) एकमेकांपासून स्वतंत्र असायला हव्यात. मात्र, स्वातंत्र्याच्या सात दशकांनंतरही महसूल प्रशासनातील अर्धन्यायिक (Quasi-Judicial) व्यवस्था याच घटनात्मक तत्त्वाला हरताळ फासत आहे. आज महसूल अधिकाऱ्यांच्या दालनात चालणारे कामकाज न्यायशास्त्र, गांभीर्य आणि पारदर्शकतेला तिलांजली देणारे ठरत असून, ही यंत्रणा केवळ प्रशासकीय अधिकारांचा गैरवापर आणि भ्रष्टाचाराचे केंद्र बनली आहे. पुणे आणि संपूर्ण महाराष्ट्रातील वकिलांमधून महसूल प्रशासनाचे 'न्यायिक' आणि 'प्रशासकीय' अशा दोन स्वतंत्र विभागांत विभाजन करण्याची उठलेली मागणी रास्त आणि तातडीने दखल घेण्याजोगी आहे.

**दुहेरी जबाबदारीचा बळी : न्यायदान**

तहसीलदार, उपविभागीय अधिकारी (SDO) किंवा जिल्हाधिकारी हे मुळात कार्यकारी अधिकारी आहेत. कायदा-



**डॉ. अशोक बालगुडे**
संपादक

सुव्यवस्था, व्हीआयपी दौरे, नैसर्गिक आपत्ती, निवडणुका आणि महसूल संकलन ही त्यांची मुख्य कामे असतात. अशा व्यस्त दिनक्रमात न्यायदान हे त्यांच्यासाठी केवळ 'दुय्यम आणि उरलेले काम' ठरते. या दुहेरी जबाबदारीचे दुष्परिणाम न्यायिक प्रक्रियेला बाधित करत आहेत.

**न्यायिक शिस्त आणि पोशाखाचा अभाव**

डायसवर बसून न्यायाधीशाच्या भूमिकेत असतानाही फोनवर बोलणे, प्रशासकीय फायली हाताळणे आणि इतर अभ्यागतांना भेटणे हे नित्याचे झाले आहे. न्यायिक कामकाजासाठी आवश्यक असलेली शिस्त, गांभीर्य आणि स्वतंत्र वातावरण अनेक ठिकाणी दिसून येत नाही.

**वकिलांशी अयोग्य व्यवहार**

न्यायालयाचे अधिकृत घटक (Officers of the Court) असणाऱ्या वकिलांना प्रशासकीय कनिष्ठ कर्मचाऱ्यांसारखी वागणूक दिली जाते, ज्यामुळे वकिली पेशाच्या प्रतिष्ठेला आणि 'बार-बेंच'च्या नात्याला गंभीर तडा जातो.

**नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचा संकोच**

दिवाणी प्रक्रिया संहिता (CPC) आणि भारतीय साक्ष कायद्याचे औपचारिक प्रशिक्षण पान ४ पहा ▸▸

# २२ लाखांची कार; तरीही मनस्ताप!

## नवीन कार द्या, नाही तर व्याजासह पैसे परत करा; ग्राहक आयोगाचा कंपनीला आदेश

डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज
developednationslaw@gmail.com

**पुणे : तब्बल २२ लाख २४ हजार रुपये मोजून कार खरेदी केल्यानंतर काही दिवसांतच इंजिनमध्ये गंभीर तांत्रिक बिघाड सुरू झाला. वारंवार अधिकृत सर्व्हिस सेंटरमध्ये दुरुस्ती करूनही दोष कायम राहिल्याने ग्राहकाला मोठा आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागला. या प्रकरणाची दखल घेत अतिरिक्त जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने कार उत्पादक कंपनीला त्याच मॉडेलचे नवीन व दोषमुक्त वाहन संपूर्ण वॉरंटीसह देण्याचा आदेश दिला आहे. नवीन वाहन देणे शक्य नसल्यास कारची संपूर्ण खरेदी किंमत व्याजासह परत करण्याचे निर्देशही आयोगाने दिले आहेत. याशिवाय ग्राहकाला झालेला मानसिक त्रास, आर्थिक नुकसान आणि न्यायालयीन खर्चापोटी १ लाख १५ हजार रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेश देण्यात आले आहेत.**

बाणेर येथील रहिवासी रामविलास कुमावत यांनी 'एमजी मोटर्स'विरोधात ग्राहक आयोगात तक्रार दाखल केली होती. कुमावत यांनी कंपनीच्या अधिकृत वितरकाकडून जून २०२० मध्ये २२ लाख २४ हजार रुपयांना कार खरेदी केली होती. मात्र, वाहन खरेदी केल्यानंतर काही दिवसांतच इंजिनमध्ये गंभीर तांत्रिक बिघाड निर्माण झाला.

सुरुवातीला किरकोळ दोष असल्याचे गृहीत धरून कुमावत यांनी वाहन अधिकृत सर्व्हिस सेंटरमध्ये दुरुस्तीसाठी नेले. कंपनीकडून दुरुस्ती करण्यात आली; मात्र वाहन वापरात आणल्यानंतर पुन्हा त्याच प्रकारचा दोष निर्माण होत राहिला. त्यामुळे कार अनेक वेळा सर्व्हिस सेंटरमध्ये द्यावी




लागली. परिणामी, महागडी कार खरेदी करूनही तिचा अपेक्षित पद्धतीने वापर करणे ग्राहकाला शक्य झाले नाही.

वारंवार दुरुस्ती, सर्व्हिस सेंटरच्या फेऱ्या, वेळेचा अपव्यय आणि आर्थिक नुकसान यामुळे कुमावत यांना मानसिक त्रासालाही सामोरे जावे लागले. कंपनीकडून दोष कायमस्वरूपी दूर करण्यासाठी प्रयत्न झाले, तरी अपेक्षित परिणाम मिळाला नाही. अखेर कुमावत यांनी ॲड. समीर काळे यांच्यामार्फत ग्राहक आयोगात धाव घेतली.

**दुरुस्तीचा इतिहास ठरला महत्त्वाचा**

तक्रारीच्या सुनावणीदरम्यान वाहनाचे सर्व्हिस रेकॉर्ड, दुरुस्तीचा इतिहास, तांत्रिक कागदपत्रे आणि अन्य संबंधित पुरावे आयोगासमोर सादर करण्यात आले. वाहनातील दोष वारंवार दुरुस्ती करूनही दूर झाला नसल्याचा मुद्दा तक्रारदाराच्या वतीने मांडण्यात आला.

इंजिनमधील बिघाड हा केवळ वाहनाच्या वापरामुळे निर्माण झालेला नसून वाहनाच्या उत्पादनाशी संबंधित मूलभूत दोष असल्याचे तक्रारदाराच्या वतीने सांगण्यात आले. वाहन विक्रीनंतर ग्राहकाला अपेक्षित दर्जाची सेवा मिळणे ही उत्पादकाची जबाबदारी असल्याचेही ॲड. काळे यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले.

पुरावे आणि प्रकरणातील परिस्थितीचा विचार करून आयोगाने पान ४ पहा ▸▸

### 'वारंवार दुरुस्ती म्हणजे दोषमुक्त सेवा नव्हे'

"उत्पादनातील मूलभूत दोष असलेल्या वाहनाची केवळ वारंवार दुरुस्ती करून उत्पादक आपली जबाबदारी झटकू शकत नाही. ग्राहकाने मोठी रक्कम मोजून वाहन खरेदी केल्यानंतर त्याला विश्वासार्ह आणि दोषमुक्त वाहन मिळणे अपेक्षित असते. या निर्णयामुळे ग्राहक संरक्षणाच्या तत्त्वाला बळ मिळाले असून वाहन उत्पादकांना उत्पादनाची गुणवत्ता आणि विक्रीनंतरची सेवा याबाबत अधिक जबाबदारीने वागण्याचा स्पष्ट संदेश मिळतो," असे तक्रारदार ग्राहकाचे वकील ॲड. समीर काळे यांनी सांगितले.

# आरोपींचे 'मौन' ठरले खुनाचा पुरावा!

## वृद्ध महिलेच्या हत्येप्रकरणी दोघांना जन्मठेप; न्यायालयाचे महत्त्वपूर्ण निरीक्षण

डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज
developednationslaw@gmail.com

**पुणे :** घरात झोपलेल्या वृद्ध महिलेवर प्राणघातक हल्ला झाला असताना त्याची आपल्याला कल्पनाच नव्हती, असा आरोपींचा दावा न्यायालयाने फेटाळून लावला. घटनेचे स्पष्टीकरण देण्याची जबाबदारी आरोपींची असताना त्यांनी बाळगलेले मौन हे प्रबळ परिस्थितीजन्य पुरावा ठरते, असे निरीक्षण नोंदवत अतिरिक्त सत्र न्यायालयाने वृद्ध महिलेच्या खूनप्रकरणी दोघांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली. आरोपींनी गावातील विरोधकांना खोट्या खुनाच्या गुन्ह्यात अडकविण्याच्या उद्देशाने स्वतःच्या कुटुंबातील महिलेचा खून केल्याचे तपासात निष्पन्न झाले.

अतिरिक्त सत्र न्यायाधीश रवींद्र हिवसे यांनी आजिनाथ ठानलाल भोसले (४०) आणि आकाश शिवराम चव्हाण (२९, दोघे रा. वाडे बोल्हाई, खुटाळे वस्ती) यांना जन्मठेप आणि प्रत्येकी एक हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली.

ही घटना २५ जून २०१६ रोजी घडली होती. आरोपींच्या हल्ल्यात मांगी भोसले यांचा मृत्यू झाला. शवविच्छेदन अहवालात त्यांच्या शरीरावर अनेक गंभीर जखमा आढळल्या. आजिनाथ भोसले याने पोलिसांना घटनेची माहिती देताना आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यास सांगितले होते. मात्र, तपासादरम्यान हा खून गावातील विरोधकांना खोट्या गुन्ह्यात अडकविण्याच्या कटातून करण्यात आल्याचे समोर आले.

पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक करून आरोपपत्र दाखल केले. खटल्यात सरकारी वकील प्रदीप गेहलोत यांनी दहा साक्षीदार तपासले. आरोपींच्या कपड्यांवर तसेच लोखंडी रॉडवर मानवी रक्ताचे डाग आढळल्याचे पुराव्यातून स्पष्ट झाले.

**'हल्ल्याची कल्पना नव्हती' हा दावा फेटाळला**

बचाव पक्षाने हा खटला राजकीय दबावातून दाखल करण्यात आल्याचा, तसेच आरोपी पारधी पान ४ पहा ▸▸

YUVRAJ DHAMALE CORP

'युवराज ढमाले कॉर्प' कडून वृत्तपत्राला पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!

— DEVELOPED NATIONS —
डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज

# ‘तुम्ही मध्ये पडू नका!’ मालमत्तेच्या वादात पोलिसांना न्यायालयाची कानपिचकी

## मालकीचा निवाडा खाकीने नव्हे, न्यायालयानेच करायचा; नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करणारा महत्त्वपूर्ण संदेश

**घर किंवा जमिनीचा तुकडा सामान्य माणसासाठी केवळ मालमत्ता नसतो; त्यात आयुष्यभराची कमाई, कष्ट आणि सुरक्षिततेची स्वप्ने गुंतलेली असतात. त्यामुळे मालकी हक्काचा वाद निर्माण झाला की माणूस आधीच अस्वस्थ असतो. त्यात न्यायालयात प्रकरण प्रलंबित असतानाही पोलिसांनी एखाद्या पक्षकारावर दबाव आणला, तर कायद्याचा आधार घेण्यासाठी गेलेल्या नागरिकासमोरच ‘खाकीचा धाक’ उभा राहतो. अशा वेळी अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिलेला संदेश अत्यंत स्पष्ट आहे.मालमत्तेचा मालक कोण, हे पोलिसांनी ठरवायचे नाही; त्यासाठी न्यायालय आहे.**

न्या. शेखर सराफ आणि न्या. अवधेश कुमार चौधरी यांच्या खंडपीठाने स्थावर मालमत्तेच्या मालकी किंवा ताब्याच्या वादात पोलिसांनी हस्तक्षेप करून न्यायनिवाडा करू नये, असे स्पष्ट केले आहे. प्रकरणाची पार्श्वभूमीही गंभीर आहे. ८५ वर्षीय वृद्ध महिलेचा नातेवाईकांशी कौटुंबिक मालमत्तेवरून वाद सुरू होता आणि त्यासंदर्भातील दिवाणी खटला न्यायालयात प्रलंबित होता. असे असतानाही पोलिसांकडून चौकशीच्या नावाखाली दबाव आणला जात असल्याची तक्रार करण्यात आली. त्याविरोधात वृद्ध महिलेने उच्च न्यायालयाचे दार ठोठावले.

न्यायालयाने या प्रकरणातून अधिकारक्षेत्राची सीमारेषाच अधोरेखित केली. एखाद्या जमिनीचा मालक कोण, कायदेशीर ताबा कोणाचा, दोन मालमत्तांमधील हद्द नेमकी कुठपर्यंत—हे प्रश्न पुरावे, कागदपत्रे आणि कायद्याच्या आधारे दिवाणी न्यायालयाने ठरवायचे असतात. पोलिस किंवा अन्य प्रशासकीय अधिकारी न्यायाधीशाची भूमिका घेऊ शकत नाहीत.

आपल्या समाजात मात्र ‘पोलिस ठाण्याची नोटीस’ एवढ्यानेच सामान्य नागरिक घाबरतो. या मानसिकतेचा गैरफायदा घेऊन एखादा पक्षकार दुसऱ्याला वठणीवर आणण्यासाठी पोलिस यंत्रणेचा वापर करीत असेल, तर हा प्रकार केवळ व्यक्तीविरोधातील दबाव राहत नाही; तो न्यायालयीन प्रक्रियेच्या अधिकारावरच घाला ठरतो.

विशेषतः मालमत्तेचा वाद न्यायालयात प्रलंबित असताना एका पक्षकाराला पोलिस ठाण्यात बोलावणे, धमकावणे, दबाव आणणे किंवा मालमत्तेतून बाहेर पडण्यास भाग पाडणे, ही न्यायव्यवस्थेला समांतर प्रक्रिया उभी करण्याची धोकादायक प्रवृत्ती आहे. खाकीला अधिकार आहे; पण मालकी ठरविण्याचा अधिकार नाही.

याचा अर्थ मालमत्तेच्या वादात पोलिसांची भूमिका शून्य आहे, असा नाही. वादातून हाणामारी, हिंसाचार किंवा सार्वजनिक शांतता भंग होण्याची शक्यता असल्यास कायदा व सुव्यवस्था राखणे ही पोलिसांची जबाबदारी आहे. दिवाणी न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ती मदतही पोलिस देऊ शकतात. मात्र, त्या आदेशाच्या पलीकडे जाऊन मालकी किंवा ताब्याचा स्वतःहून निर्णय देणे त्यांच्या अधिकारक्षेत्राबाहेरचे आहे.

महसूल यंत्रणेलाही याच मर्यादा लागू होतात. महसूल नोंदी, फेरफार किंवा प्रशासकीय प्रक्रिया यांना त्यांचे स्वतंत्र महत्त्व असले, तरी खासगी मालकी हक्काचा अंतिम न्यायनिवाडा करण्याचे काम महसूल अधिकाऱ्यांचे नाही. प्रत्येक शासकीय संस्थेचे अधिकारक्षेत्र कायद्याने निश्चित केले आहे. अधिकार मिळाला म्हणून तो अमर्याद झाला, असे समजणे हीच कायद्याच्या राज्यासाठी धोक्याची सुरुवात आहे.



**ॲड. विश्वनाथ गरुड**
माध्यम अभ्यासक; प्रिंट आणि डिजिटल माध्यम व्यवसायाचा दोन दशकांहून अधिक अनुभव. सध्या शिवाजीनगर जिल्हा व सत्र न्यायालयात पूर्णवेळ वकील म्हणून कार्यरत.

या प्रकरणातून पोलिस प्रशासनानेही आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. नागरिकाच्या तक्रारीची दखल घेणे आणि कायदा-सुव्यवस्था राखणे हे पोलिसांचे कर्तव्य आहे; पण दोन खासगी व्यक्तींमधील हक्काचा वाद स्वतःच्या अधिकाराने मिटविणे हे त्यांचे काम नाही. अन्यथा न्यायालयात सुरू असलेल्या प्रक्रियेवर पोलिस ठाण्याचा दबाव निर्माण होईल.

लोकशाहीची ताकदच अधिकारांच्या विभाजनात आहे. पोलिसांनी कायदा अंमलात आणायचा, तपास करायचा आणि शांतता राखायची. महसूल प्रशासनाने आपल्या कायदेशीर अधिकारक्षेत्रात काम करायचे. न्यायालयाने हक्कांचा निवाडा करायचा. ही सीमारेषा पुसली तर ‘कायद्याचे राज्य’ उरणार नाही; त्याऐवजी ‘ज्याच्या हातात सत्ता त्याचा न्याय’ अशी धोकादायक स्थिती निर्माण होईल.

सर्वसामान्य नागरिकांसाठी या निकालाचा संदेश तितकाच महत्त्वाचा आहे. घर, जमीन, वारसा किंवा ताब्याचा वाद असेल तर कायदेशीर कागदपत्रे आणि पुराव्यांच्या आधारे सक्षम न्यायालयात दाद मागणे हा योग्य मार्ग आहे. पोलिसांकडे तक्रार केली म्हणून मालकी हक्क सिद्ध होत नाही आणि पोलिसांच्या दबावामुळे कोणाचाही कायदेशीर हक्क आपोआप संपत नाही.

न्यायालयाने पोलिसांना दिलेली ही कानपिचकी म्हणूनच केवळ एका प्रकरणापुरती मर्यादित नाही. ती प्रत्येक अधिकाऱ्याला आणि प्रत्येक नागरिकाला कायद्याच्या सीमांची आठवण करून देणारी आहे. मालकीचा निर्णय खाकीच्या धाकाने नव्हे, तर कायद्याच्या कसोटीवर झाला पाहिजे.

पोलिसांनी कायदा हातात घ्यावा; न्याय नाही. न्यायासनावर बसण्याचा अधिकार न्यायालयाचाच. नागरिकांच्या घराचे, जमिनीचे आणि हक्कांचे संरक्षण ‘वर्दीच्या दबावाने’ नव्हे, तर कायद्याच्या आधाराने झाले पाहिजे. ■■■

# पहिल्याच युक्तिवादात जामीन; आत्मविश्वासाने घडला वकिलीचा प्रवास!

कँटोन्मेंट कोर्टातील पहिल्या ‘मेन्शनिंग’पासून महाराष्ट्राबाहेरील न्यायालयांपर्यंत ॲड. विराज करचे यांची उल्लेखनीय वाटचाल.... वकिलीच्या पहिल्याच दिवशी न्यायालयासमोर उभे राहण्याची भीती... त्यानंतर काही दिवसांतच बलात्काराच्या गंभीर गुन्ह्यातील आरोपीच्या जामिनासाठी न्यायालयात युक्तिवाद करण्याचे आव्हान! या आव्हानाला आत्मविश्वासाने सामोरे जात न्यायालयाला कायदेशीर मुद्दे पटवून देत जामीन मिळवून देणारे ॲड. विराज बाबासाहेब करचे यांचा वकिलीचा प्रवास संघर्ष, धाडस आणि आत्मविश्वासाची प्रेरणादायी कहाणी आहे.



**ॲड. विराज करचे**

बीसीएस, एलएलबी, डीसीसीएलचे शिक्षण घेतलेल्या ॲड. करचे यांनी २०१५ मध्ये लॉ कॉलेज, हडपसर येथून वकिलीचे शिक्षण पूर्ण करून बार कौन्सिलमध्ये नोंदणी केली आणि सनद प्राप्त केली. पुणे कँप येथील कँटोन्मेंट कोर्टात ॲड. नरेंद्र जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली ज्युनियर म्हणून त्यांनी वकिलीची सुरुवात केली. पहिल्याच दिवशी जाधव यांनी त्यांना एका प्रकरणात न्यायालयासमोर ‘मेन्शनिंग’ करण्यासाठी उभे केले. मनात धाकधूक होती; मात्र आत्मविश्वासाने त्यांनी काम पूर्ण केले. तो पहिला क्षणच पुढील वकिलीच्या प्रवासाचा आत्मविश्वास ठरला.

वकिलीच्या सुरुवातीच्या काळातच आलेले पहिले गंभीर प्रकरण त्यांच्या कारकिर्दीतील महत्त्वाचा टप्पा ठरले. ॲड. विशाल लोखंडे यांनी आळंदी पोलिस ठाण्यातील बलात्काराच्या गुन्ह्याची एफआयआर पाठवून जामिनासाठी प्रयत्न करण्यास सांगितले. अनुभव कमी आणि प्रकरण गंभीर असल्याने सुरुवातीला ते काहीसे घाबरले. मात्र, त्यांनी ॲड. नरेंद्र जाधव यांचे मार्गदर्शन घेतले. त्यानंतर स्वतः बेल अर्जाचा मसुदा तयार करून तो खेड-राजगुरुनगर न्यायालयात दाखल केला.

प्रकरण सुनावणीस आले आणि त्यांचे नाव पुकारले गेले. सुरुवातीची भीती बाजूला सारत त्यांनी प्रकरणातील कायदेशीर मुद्दे आणि वस्तुस्थिती न्यायालयासमोर मांडली. युक्तिवाद ग्राह्य धरत न्यायालयाने आरोपीचा जामीन मंजूर केला. वकिलीच्या पहिल्या मोठ्या परीक्षेत मिळालेले हे यश त्यांच्या आत्मविश्वासाला नवी उभारी देणारे ठरले. युक्तिवादानंतर एका ज्येष्ठ वकिलांनी, “बाळ, छान युक्तिवाद केला,” अशी दिलेली शाबासकी आजही त्यांच्या स्मरणात आहे.

त्यानंतर ॲड. करचे यांनी विविध स्वरूपाच्या अनेक प्रकरणांमध्ये न्यायालयीन कामकाज केले. महाराष्ट्रातील विविध न्यायालयांसह महाराष्ट्राबाहेरही त्यांनी वकिली केली. विजापूर (कर्नाटक), अहमदाबाद (गुजरात), पोर्ट ब्लेअर (अंदमान-निकोबार) आणि इंदूर (मध्य प्रदेश) येथे जाऊनही त्यांनी प्रकरणांमध्ये युक्तिवाद केला आहे. वेगवेगळ्या न्यायालयांचा अनुभव आणि सातत्याने कायद्याचा अभ्यास करण्याची वृत्ती यामुळे त्यांच्या व्यावसायिक वाटचालीला व्यापक आयाम मिळाला.

सन २०२०-२१ मध्ये पुणे बार असोसिएशनच्या सदस्यपदी निवडून येत संघटनेच्या कामकाजात सहभागी होण्याची संधीही त्यांना मिळाली. वकिलीच्या क्षेत्रात दशकभर उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल २०२५ मध्ये ऐतिहासिक लाल महल येथे त्यांना ‘शिवसन्मान पुरस्कार’ देऊन गौरविण्यात आले.

ॲड. विराज करचे यांची वाटचाल नवोदित वकिलांसाठी एक महत्त्वाचा संदेश देते— वकिलीमध्ये पहिली भीती स्वाभाविक असते; पण अभ्यास, मार्गदर्शन आणि आत्मविश्वासाच्या जोरावर तीच भीती पुढे ताकद बनते. न्यायालयात उभे राहण्याची संधी मिळाल्यावर मागे न हटता कायद्याच्या कसोटीवर आपली बाजू मांडण्याची तयारी असेल, तर अनुभवाचा प्रत्येक दिवस वकिलाला अधिक सक्षम बनवतो.

“पहिल्या दिवसाची धडधड ते न्यायालयातील आत्मविश्वास” हा ॲड. करचे यांच्या प्रवासाचा खरा गाभा आहे. ■■■

# रक्षाबंधनाआधीच बहिणीचा अंत; भावाचा टाहो

डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज
developednationslaw@gmail.com

**पुणे :** बहिण-भावाच्या नात्याचा सण असलेल्या रक्षाबंधनाच्या काही तास आधीच पुण्यातील वाकड परिसरात एका विवाहितेचा संशयास्पद मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त होत आहे. शिल्पा सचिन गवारे (३२) यांच्या मृत्यूमागे सासरच्या मंडळींकडून झालेला शारीरिक व मानसिक छळ कारणीभूत असल्याचा आरोप



त्यांच्या माहेरच्यांनी केला आहे.

शिल्पा यांच्या विवाहानंतर काही काळाने संसारात वाद सुरू झाल्याचे त्यांच्या कुटुंबीयांनी सांगितले. पती सचिन गवारे, सासरे उत्तम गवारे आणि सासू संजीवनी गवारे यांच्याकडून त्यांचा कथित छळ केला जात होता. माहेरच्या मालमत्तेतील हिस्सा घेऊन येण्यासाठी त्यांच्यावर दबाव टाकला जात असल्याचाही आरोप आहे. पैसे आणि संपत्तीच्या मागणीवरून शिवीगाळ व मारहाण होत असल्याचे नातेवाईकांनी सांगितले.

शिल्पा यांच्या भावाने केलेले आरोप अधिकच मन हेलावून टाकणारे आहेत. पती दारूच्या नशेत शिल्पा यांना मारहाण करायचा. काही दिवसांपूर्वी त्यांच्या डोक्यात इस्त्री मारण्यात आली, तर यापूर्वीही त्यांना इस्त्रीचे चटके दिल्याचा आरोप भावाने केला आहे. परिस्थिती एक दिवस सुधारेल, या आशेने कुटुंबीय गप्प राहिल्याचेही त्याने सांगितले. शिल्पा अत्यंत संयमी स्वभावाच्या होत्या. त्यामुळे त्या स्वतःहून टोकाचे पाऊल उचलतील, यावर विश्वास बसत नसल्याचे भावाने सांगितले. मालमत्तेच्या वादावरून बोलताना शिल्पा यांनी, “भाऊ, तू जिथे सांगशील तिथे मी सही देते. मला शेवटपर्यंत आपलं भाऊ-बहिणीचं नातं जपायचंय,” असे म्हटल्याचे त्याने सांगितले. रक्षाबंधनाच्या दिवशी बहिणीच्या हातावर राखी बांधण्याचे स्वप्न पाहणाऱ्या भावाच्या हातात अखेर बहिणीचे पार्थिव आले. सणाच्या आनंदाऐवजी घरात आक्रोश पसरला. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नातेवाईकांनी केली आहे. पोलिसांचा तपास सुरू असून शिल्पा यांच्या मृत्यूमागील नेमके कारण तपासातून स्पष्ट होणार आहे. रक्षाबंधन केवळ राखीचा धागा नाही; तो बहिणीच्या सुरक्षिततेचे आणि भावाच्या आधाराचे प्रतीक आहे. मात्र, त्याच नात्याच्या सणाच्या उंबरठ्यावर एका बहिणीचा जीव जाणे ही केवळ एका कुटुंबाची शोकांतिका नसून, घराच्या चार भिंतीआड सुरू असलेल्या हिंसाचाराकडे समाजाने डोळेझाक करू नये, असा अस्वस्थ करणारा इशारा आहे.

# जात पडताळणी समित्याच रद्द करा; जरांगेंचा सरकारला इशारा

## ५८ लाख कुणबी नोंदींच्या आधारे प्रमाणपत्रांची मागणी; मागण्या मान्य न झाल्यास मुंबईकडे कूच करण्याचा निर्धार

डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज
developednationslaw@gmail.com

**जालना :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी शनिवारी आंतरवाली सराटी येथे पुन्हा आमरण उपोषण सुरू केले. न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीने शोधलेल्या ५८ लाख कुणबी नोंदींच्या आधारे पात्र मराठा-कुणबींना प्रमाणपत्रे देण्यात यावीत, प्रमाणपत्रांची पडताळणी तातडीने पूर्ण करावी आणि जात पडताळणी समित्याच रद्द कराव्यात, अशी मागणी जरांगे यांनी केली आहे. सरकारने मागण्यांवर ठोस निर्णय घेतला नाही, तर आंदोलन मुंबईच्या दिशेने नेण्याचा इशाराही त्यांनी दिला.

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर सरकारकडून वारंवार आश्वासने दिली जात असली तरी प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप जरांगे यांनी केला. गेल्या काही वर्षांपासून सरकारसमोर विविध मागण्या मांडत असूनही त्यावर अपेक्षित निर्णय झालेला नाही. त्यामुळे आता कोणत्याही आश्वासनावर समाधान न मानता मागण्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याची भूमिका त्यांनी घेतली आहे.

### ५८ लाख नोंदींचा आधार

न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीने शोधलेल्या ५८ लाख कुणबी नोंदी हा जरांगे यांच्या आंदोलनाचा प्रमुख मुद्दा आहे. या नोंदी सरकारनेच उपलब्ध करून दिल्या असल्याने त्यामध्ये पात्र असलेल्या व्यक्तींना कुणबी प्रमाणपत्र देण्यास विलंब का केला जात आहे, असा सवाल त्यांनी केला आहे. या नोंदींच्या आधारे तलाठी, ग्रामसेवक आणि संबंधित अधिकाऱ्यांना प्रमाणपत्र देण्याचे स्पष्ट निर्देश द्यावेत, अशी त्यांची मागणी आहे.

प्रमाणपत्र मिळाल्यानंतर जात वैधता प्रमाणपत्राच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण होत असल्याचा आरोपही जरांगे यांनी केला. त्यामुळे केवळ कुणबी प्रमाणपत्र देऊन प्रश्न सुटणार नाही; त्यानंतरची वैधता प्रक्रिया सुलभ आणि वेगवान



करणे आवश्यक असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

### 'जात पडताळणी समित्यांची गरज काय?'

जात पडताळणी समित्यांमार्फत प्रमाणपत्रांची छाननी केली जाते. मात्र, या प्रक्रियेमुळे पात्र व्यक्तींनाही अडचणींचा सामना करावा लागत असल्याचा दावा जरांगे यांनी केला आहे. त्यामुळे जात पडताळणी समित्याच बरखास्त करण्याची मागणी त्यांनी केली आहे. कुणबी नोंदी उपलब्ध असताना त्यावर आधारित प्रमाणपत्र देण्यासाठी पुन्हा स्वतंत्र पडताळणीची आवश्यकता काय, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला आहे. मात्र, सरकारच्या भूमिकेनुसार प्रमाणपत्र देताना आवश्यक कागदपत्रे आणि कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. काही प्रकरणे न्यायालयीन प्रक्रियेत असल्याने त्याबाबत स्वतंत्र निर्णय घेता येणार नसल्याचेही सरकारकडून स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे जरांगे यांच्या मागणीवर सरकारसमोर कायदेशीर आणि प्रशासकीय पेच निर्माण झाला आहे.

### सरकारच्या शिष्टमंडळाशी चर्चेनंतरही उपोषण

२९ ऑगस्टच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सरकारच्या शिष्टमंडळाने जरांगे यांच्याशी चर्चा केली होती. कुणबी प्रमाणपत्र, जात वैधता, जुन्या शासन निर्णयांची अंमलबजावणी आणि इतर मागण्यांवर चर्चा झाली. मात्र, चर्चेनंतरही समाधानकारक तोडगा निघाला नसल्याने जरांगे यांनी आंदोलनाचा निर्णय कायम ठेवला.

सरकारने मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेतल्याचे सांगितले असले तरी ठोस निर्णय होईपर्यंत माघार घेणार नसल्याचे जरांगे यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे आंतरवाली सराटी येथे सकाळपासून समर्थकांची गर्दी होण्यास सुरुवात झाली असून पोलिस बंदोबस्तही वाढविण्यात आला आहे.

### इतर मागण्यांवरही ठाम

कुणबी प्रमाणपत्र आणि जात वैधतेबरोबरच मराठा समाजाशी संबंधित विविध जुन्या गॅझेटची अंमलबजावणी, आंदोलनातील गुन्हे मागे घेणे, 'सगे-सोयरे' अधिसूचनेची अंमलबजावणी, सारथीच्या योजना व शिष्यवृत्ती, आंदोलनादरम्यान मृत्यू झालेल्यांच्या कुटुंबीयांना मदत आदी मागण्याही जरांगे यांनी सरकारसमोर मांडल्या आहेत. मराठा समाजासाठी स्वतंत्र मंत्रालय किंवा स्वतंत्र प्रशासकीय यंत्रणा निर्माण करण्याची मागणीही त्यांच्या भूमिकेत आहे. या सर्व मागण्यांवर सरकारने एकत्रित निर्णय घ्यावा, अशी त्यांची भूमिका आहे.

### मुंबईकडे आंदोलन नेण्याचा इशारा

आंतरवाली सराटी येथील उपोषणानंतरही मागण्यांवर निर्णय झाला नाही, तर आंदोलन मुंबईच्या दिशेने नेण्याचा इशारा जरांगे यांनी दिला आहे. त्यामुळे आंदोलनाचे पुढील स्वरूप काय असेल, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. मराठा समाजाने मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

५८ लाख नोंदी, कुणबी प्रमाणपत्रे आणि जात वैधता समित्यांचा प्रश्न यामुळे मराठा आरक्षणाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. एकीकडे सरकार कायदेशीर प्रक्रिया आणि उपलब्ध नोंदींच्या आधारे प्रमाणपत्र देण्याची भूमिका मांडत आहे, तर दुसरीकडे जरांगे हेच प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया अधिक सुलभ करून जात पडताळणीची यंत्रणा हटविण्याची मागणी करीत आहेत. त्यामुळे आगामी काळात सरकार आणि मराठा आंदोलक यांच्यातील संघर्षाची दिशा काय राहते, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

# प्लाझ्मा, प्रेशर मिडला 'नो एंट्री'; नियमभंग केल्यास साउंड सिस्टिम जप्त

**पुणे :** गणेशोत्सवातील ध्वनिप्रदूषणाला आळा घालण्यासाठी पुणे पोलिसांनी यंदा कठोर भूमिका घेतली आहे. प्लाझ्मा आणि प्रेशर मिडवर शंभर टक्के बंदी राहणार असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांची संपूर्ण ध्वनिक्षेपक यंत्रणा जप्त केली जाईल, असा स्पष्ट इशारा पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिला.

गणेशोत्सव आणि अन्य सण-उत्सव प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार साजरे करणे बंधनकारक असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. प्लाझ्मा, प्रेशर मिड आणि लेसरमुळे होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाबाबत पोलिसांनी गणेश मंडळांशी चर्चा केली आहे. विसर्जन मिरवणुकीतील ध्वनियंत्रणाबाबतही मंडळांशी चर्चा सुरू असून, चार बेस आणि चार टॉपपेक्षा अधिक साउंड सिस्टिम न वापरण्याची भूमिका मंडळांनी मांडली आहे. मोकळ्या जागेतील स्थिर कार्यक्रमांसाठी सहा बेस आणि सहा टॉप वापरण्याची मागणी काही मंडळांनी केली आहे. याबाबत अंतिम निर्णय चर्चेनंतर घेतला जाणार आहे. दरम्यान, मागील मिरवणुकीत सहा ठिकाणी प्लाझ्मा आणि प्रेशर मिडचा वापर आढळल्याने संबंधितांची संपूर्ण साउंड सिस्टिम जप्त करण्यात आली. पोलिसांनी एक हजारांहून अधिक ध्वनी चाचण्या घेतल्या असून, १४८ ठिकाणी निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक डेसिबल आढळल्याने कारवाई सुरू केली आहे.

### ढोल-ताशांवरही नजर

ढोल-ताशा पथकांच्या सरावामुळे ध्वनिप्रदूषण होत असल्याच्या तक्रारी पोलिसांकडे आल्या आहेत. त्यामुळे विसर्जन मिरवणुकीत प्रत्येक मंडळाला किती ढोल-ताशा पथके ठेवता येतील, यावरही निर्णय होण्याची शक्यता आहे. लक्ष्मी रोड आणि टिळक रोडवरील मिरवणुकीसाठी सुमारे १८० ते १९० मंडळांशी पोलिसांची चर्चा सुरू आहे. ■■■

# रिकामी भिंत ते 'नोटरी'चा सन्मान!

## ॲड. शाहीन एच. पठाण (नोटरी, भारत सरकार) यांचा संघर्षमय प्रवास

**कार्यालयातील एका रिकाम्या भिंतीवर नोटरीच्या प्रमाणपत्रासाठी जागा राखून ठेवली होती. त्या भिंतीने अपयश पाहिले, प्रतीक्षा पाहिली आणि अखेर यशाचाही साक्षीदार झाली. आज त्या भिंतीकडे पाहताना पदापेक्षा संघर्षाचा आणि जिद्दीचा सन्मान वाटतो. ॲड. शाहीन एच. पठाण यांचा नोटरी होण्याचा प्रवास ही केवळ व्यावसायिक यशोगाथा नसून स्वप्न, अपयश, संयम आणि ध्येयपूर्तीची प्रेरणादायी कहाणी आहे.**

वकिली व्यवसायात दिवाणी, कौटुंबिक आणि मालमत्ताविषयक प्रकरणांशी संबंधित काम करताना अनेक नागरिक कागदपत्रांच्या नोटरीसाठी त्यांच्या कार्यालयात येत असत. मात्र नोटरीचा अधिकृत अधिकार नसल्यामुळे त्यांना दुसऱ्या कार्यालयात जावे लागे. नागरिकांचा वेळ जाताना आणि त्यांची गैरसोय होताना पाहून पठाण यांच्या मनात वारंवार एकच प्रश्न उमटत असे. 'मी स्वतः नोटरी का होऊ नये?'

वकील आणि नोटरी या दोन स्वतंत्र कायदेशीर भूमिका आहेत. प्रत्येक वकील आपोआप नोटरी होत नाही. पात्रता, अनुभव, नियुक्तीची प्रक्रिया आणि प्रतीक्षा या अनेक टप्प्यांतून जावे लागते. पहिल्या प्रयत्नात निवड झाली नाही. कार्यालयातील तीच रिकामी भिंत मात्र रोज एक प्रश्न विचारत राहिली—'अजून किती दिवस?'



ॲड. शाहीन एच. पठाण
नोटरी, भारत सरकार



अपयशाने प्रवास थांबला नाही. उलट त्याने संयम आणि जिद्द अधिक दृढ केली. पुन्हा अर्ज केला, मुलाखत दिली आणि अखेर नोटरी म्हणून नियुक्तीचे पत्र हातात आले. तो क्षण त्यांच्या आयुष्यातील अविस्मरणीय क्षण ठरला. कार्यालयात परतल्यावर ज्या रिकाम्या भिंतीने अपयश पाहिले होते, त्याच भिंतीला मिठी मारून आनंदाश्रू ढाळले. कारण आता ती भिंत रिकामी राहणार नव्हती.

या प्रवासातील एक प्रसंग त्यांच्या मनावर कायमचा कोरला गेला. मुसळधार पावसात एका पक्षकाराचे तातडीचे नोटरी काम करण्यासाठी दुचाकीवरून जात असताना त्यांचा अपघात झाला. जखमी अवस्थेतही मनात विचार आला. 'मी नोटरी असते, तर कदाचित आज ही धावपळ आणि गैरसोय टळली असती.' त्या वेदनेनेच त्यांच्या ध्येयाला आणखी धार दिली.

नोटरी म्हणून काम सुरू केल्यानंतर मात्र एका महत्त्वाच्या वास्तवाची जाणीव झाली. नोटरी म्हणजे केवळ कागदावर शिक्का मारण्याचे काम नाही. प्रत्येक स्वाक्षरीमागे एखाद्या व्यक्तीचा हक्क, कुटुंबाचा व्यवहार, संपत्तीचा प्रश्न किंवा भविष्यातील कायदेशीर जबाबदारी असू शकते. दस्तऐवजाचे प्रमाणीकरण करताना नागरिकांचा कायद्यावरील विश्वास जपण्याची जबाबदारी नोटरीवर असते.

म्हणूनच नोटरीपदाकडे केवळ प्रतिष्ठेचे पद म्हणून पाहणे योग्य नाही. ते विश्वासाचे पद आहे. एका शिक्क्यामागे कायदेशीर जबाबदारी असते आणि एका स्वाक्षरीमागे अनेकदा एखाद्या कुटुंबाचे भविष्य उभे असते. त्यामुळे प्रत्येक दस्तऐवजाकडे दक्षता, प्रामाणिकपणा आणि कायदेशीर बांधिलकीने पाहणे आवश्यक आहे.

जुन्नरच्या भूमीत जन्मलेल्या ॲड. शाहीन पठाण यांच्या वाटचालीला संघर्षाची आणि सामाजिक बांधिलकीची प्रेरणा लाभली. वकिलीपासून नोटरीपदापर्यंतचा प्रवास सांगतो की यशाची खरी किंमत अंतिम टप्प्यात नसते; ती त्याआधीच्या प्रतीक्षेत, अपयशात आणि पुन्हा उभे राहण्याच्या क्षमतेत असते.

पहिल्या प्रयत्नातील अपयशाने नम्रता दिली, प्रतीक्षेने संयम शिकवला आणि दुसऱ्या प्रयत्नातील यशाने जबाबदारीची जाणीव करून दिली. आज कार्यालयातील ती भिंत रिकामी नाही. तिच्यावर विराजमान झालेले नोटरीचे प्रमाणपत्र केवळ एका पदाची घोषणा करत नाही; ते एका संघर्षाची साक्ष देते.

रिकामी भिंत कायम रिकामी राहत नाही. स्वप्न जिवंत असेल, प्रयत्न प्रामाणिक असतील आणि जिद्द अढळ असेल, तर एक दिवस त्याच भिंतीवर यशाचे प्रमाणपत्र अभिमानाने विराजमान होते. आणि म्हणूनच ॲड. शाहीन एच. पठाण यांच्या प्रवासाचा सार एका वाक्यात सांगता येईल. 'नोटरी' म्हणजे केवळ सही आणि शिक्का नव्हे; तो सत्य, विश्वास आणि कायदेशीर प्रामाणिकतेची जबाबदारी आहे. ■■■

DEVELOPED NATIONS
डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज

## ‘कायद्याच्या वाटेवरून विकसित राष्ट्राकडे!’

# न्याय हवा; केवळ तारीख नको!

न्यायालयाचा खरा केंद्रबिंदू पक्षकार; विलंबाची जबाबदारीही सामूहिक ‘Justice delayed is justice denied’ हे वाक्य न्यायव्यवस्थेच्या भिंतीवर लिहिण्यासाठी नव्हे, तर न्यायदानाच्या प्रत्येक टप्प्यावर आचरणात आणण्यासाठी आहे. अन्याय झालेला नागरिक शेवटी न्यायालयाचे दार ठोठावतो, तेव्हा त्याच्याकडे कायद्याच्या कलमांपेक्षा एक विश्वास असतो. इथे आपल्याला न्याय मिळेल. हा विश्वास जर वर्षानुवर्षांच्या तारखांमध्ये, तहकुबींमध्ये आणि अनिश्चित प्रतीक्षेत विरघळत गेला, तर न्यायव्यवस्थेच्या अस्तित्वाचा मूलभूत हेतूच प्रश्नांकित होतो.

न्यायाची संकल्पना आधुनिक नाही. इ.स. १२१५ मधील मॅग्ना कार्टाने राजसत्तेलाही कायद्याच्या चौकटीत बांधण्याचा ऐतिहासिक विचार पुढे आणला. पुढे फ्रेंच राज्यक्रांतीने स्वातंत्र्य, समानता आणि कायद्यापुढील समानतेची तत्त्वे अधोरेखित केली. आधुनिक लोकशाहीत न्यायालये सत्तेची सोय म्हणून नव्हे, तर नागरिकांच्या अधिकारांची संरक्षक संस्था म्हणून उभी राहिली, त्यामागे हा प्रदीर्घ वैचारिक प्रवास आहे.

भारतीय संविधानानेही नागरिकाच्या जीवन आणि स्वातंत्र्याला सर्वोच्च स्थान दिले. अनुच्छेद २१ च्या व्यापक अर्थनिर्णयातून न्याय्य आणि वाजवी प्रक्रिया हा अधिकार अधिक दृढ झाला. जगातील अनेक न्यायव्यवस्थांमध्ये वाजवी कालावधीत सुनावणी हा निष्पक्ष न्यायाचा अविभाज्य भाग मानला जातो. त्यामुळे ‘वेळेत न्याय’ ही काही आधुनिक सोय नसून न्यायाच्या संकल्पनेतीलच मूलभूत अपेक्षा आहे.

मात्र भारतीय न्यायव्यवस्थेसमोरील प्रलंबित खटल्यांचे आव्हान गंभीर आहे. या प्रश्नाकडे केवळ आकडेवारी म्हणून पाहणे धोकादायक आहे. प्रत्येक खटल्यामागे एक माणूस असतो. जमीन-विवादात अडकलेले कुटुंब, पैशासाठी न्यायालयात धाव घेणारा ग्राहक, गुन्ह्याचा आरोप असलेली व्यक्ती किंवा खोट्या आरोपाविरुद्ध लढणारा नागरिक—प्रत्येकासाठी न्यायालयीन विलंबाची स्वतंत्र किंमत असते. पैसा खर्च होतो, रोजगाराचे नुकसान होते, मानसिक ताण वाढतो आणि अनेकदा पिढ्या बदलतात.

म्हणूनच ‘तारीख मिळाली’ हे न्यायाचे उत्तर असू शकत नाही.

याचा अर्थ न्यायालयांनी घाईघाईने निकाल द्यावेत असा नाही. निष्पक्ष सुनावणी, बचावाचा अधिकार, पुराव्याचे परीक्षण आणि दोन्ही बाजूंना योग्य संधी ही न्यायाची अपरिहार्य तत्त्वे आहेत. पण ‘योग्य संधी’ आणि ‘अनिश्चित विलंब’ यांची गल्लतही होता कामा नये. जलद न्याय म्हणजे घाईचा न्याय नव्हे; तर अनावश्यक विलंब टाळून दिलेला न्याय होय.

येथे न्यायाधीशांची भूमिका निर्णायक ठरते. कायद्याचा अर्थ लावणे आणि निर्णय देणे हे त्यांचे प्रमुख कर्तव्य आहेच; पण सुनावणीचे प्रभावी व्यवस्थापनही न्यायदानाचाच भाग आहे. कोणत्या तारखेला काय होणार, किती साक्ष बाकी आहे, कोणते पुरावे सादर करायचे आहेत, याचे नियोजन झाले पाहिजे. अनावश्यक तहकूब्यांना आळा घालणे आणि प्रत्येक सुनावणीत ठोस प्रगती साधणे ही न्यायालयीन शिस्त आहे.

परंतु विलंबासाठी केवळ न्यायालयाला दोष देणेही योग्य नाही. वकील हा पक्षकाराचा प्रतिनिधी असला तरी न्यायालयाचा अधिकारी आहे. अनावश्यक तहकूब, पुनरावृत्तीचे युक्तिवाद किंवा प्रक्रियेचा गैरवापर टाळणे ही त्याची व्यावसायिक जबाबदारी आहे. न्यायालयीन वेळ ही कोणाच्या वैयक्तिक मालकीची नसून सार्वजनिक संसाधन आहे. तिचा अपव्यय म्हणजे न्यायाच्या वेळेचा अपव्यय.

पक्षकारांचीही जबाबदारी आहे. आवश्यक कागदपत्रे वेळेवर देणे, योग्य सूचना देणे आणि न्यायालयीन प्रक्रियेत सहकार्य करणे अपेक्षित आहे. त्यामुळे न्यायालयीन विलंबाची समस्या न्यायाधीश, वकील आणि पक्षकार या तिन्ही घटकांच्या सामूहिक उत्तरदायित्वातूनच सोडवावी लागेल.

न्यायालयीन निर्णयांमधून न्यायदानाची दुसरी महत्त्वाची बाजूही समोर येते. एका वृद्ध महिलेच्या खूनप्रकरणात आरोपींनी घटनेचे समाधानकारक स्पष्टीकरण न देणे आणि बाळगलेले मौन हे प्रबळ परिस्थितीजन्य पुरावे ठरल्याचे न्यायालयाने नमूद केले. म्हणजे न्यायालय केवळ प्रत्यक्ष पुराव्याची वाट पाहत नाही; उपलब्ध परिस्थितींची तार्किक साखळी तपासूनही निष्कर्षापर्यंत पोहोचते. पुराव्यांचे मूल्यमापन करताना न्यायालयीन विवेक किती महत्त्वाचा आहे, हे या प्रकरणातून दिसते.

दुसऱ्या एका ग्राहक प्रकरणात २२ लाख २४ हजार रुपये देऊन घेतलेल्या कारमध्ये वारंवार बिघाड झाल्याने ग्राहकाला नवीन दोषमुक्त वाहन किंवा खरेदीची रक्कम व्याजासह परत करण्याचा आदेश देण्यात आला. या निर्णयातून एक महत्त्वाचा संदेश मिळतो. ग्राहक हा केवळ वस्तू विकत घेणारा नाही; त्याच्या पैशाला आणि अपेक्षित गुणवत्तेला कायदेशीर संरक्षण आहे.

ही दोन्ही प्रकरणे वेगवेगळी असली तरी त्यातून एकच व्यापक तत्त्व समोर येते. न्याय हा कागदावरील आदेश नसून नागरिकाच्या आयुष्यात पोहोचलेला दिलासा असला पाहिजे.

न्यायालयाची भव्य इमारत, कायद्याचे ग्रंथ, सुनावणीची प्रक्रिया आणि निकाल यांना अर्थ तेव्हाच प्राप्त होतो, जेव्हा न्याय मागण्यासाठी आलेल्या माणसाला व्यवस्था आपली वाटते. अन्यथा कायद्यावरील विश्वासापेक्षा व्यवस्थेची भीती मोठी होऊ शकते. लोकशाहीत ही परिस्थिती धोकादायक आहे.

म्हणून न्यायव्यवस्थेच्या सुधारणेचा केंद्रबिंदू केवळ ‘किती खटले निकाली काढले?’ हा नसावा. किती नागरिकांना वेळेत न्याय मिळाला, किती अनावश्यक विलंब टाळता आला आणि किती लोकांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास दृढ झाला, ही खरी मोजपट्टी असली पाहिजे.

न्यायालय कोणासाठी, हा प्रश्न त्यामुळे पुन्हा पुन्हा विचारावा लागतो.

न्यायालय न्यायाधीशांसाठी नाही. ते वकिलांसाठीही नाही.

आणि न्यायालयीन प्रक्रिया व्यवस्थेच्या सोयीसाठी तर मुळीच नाही.

ती त्या माणसासाठी आहे, जो आपल्या हक्कासाठी शेवटची आशा घेऊन न्यायालयात येतो.

म्हणूनच आज न्यायव्यवस्थेतील प्रत्येक घटकाने स्वतःला एक अस्वस्थ करणारा प्रश्न विचारण्याची गरज आहे. “आपण न्यायालय चालवत आहोत की न्याय देत आहोत?”

तारीख ही प्रक्रियेचा भाग असू शकते; पण तारीख कधीही न्यायाचा पर्याय होऊ शकत नाही. न्यायव्यवस्थेची खरी प्रतिष्ठा निकालांच्या संख्येत नव्हे, तर न्यायालयातून बाहेर पडणाऱ्या सामान्य माणसाच्या मनात निर्माण झालेल्या विश्वासात आहे.

# विधिज्ञ विशाल काळे, पल्लवी काळे यांना ‘ग्लोबल पॉवर कपल’ पुरस्कार




डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज
developednationslaw@gmail.com

**पुणे :** विधी क्षेत्रातील उल्लेखनीय योगदान, व्यावसायिक गुणवत्ता आणि सामाजिक बांधिलकीची दखल घेत पुण्यातील कायदेतज्ज्ञ व लवाद ॲड. विशाल काळे आणि ॲड. पल्लवी काळे यांना ‘लोकमत ग्लोबल पॉवर कपल अवॉर्ड’ने सन्मानित करण्यात आले. मॉरिशस येथे आयोजित ‘लोकमत वन वर्ल्ड समिट २०२६’मध्ये त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

मॉरिशसमधील ‘ले मेरिडियन इल मॉरिस’ येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय सोहळ्यात मॉरिशसचे राष्ट्रपती धरमबीर गोखुल प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कृषी, अन्न सुरक्षा व मत्स्यव्यवसाय मंत्री डॉ. अरविंद बुलेल, तसेच माहिती तंत्रज्ञान, दळणवळण व नवोपक्रम मंत्री डॉ. अविनाश रामतोहुल यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

भारताकडून ‘लोकमत’ मीडिया समूहाच्या संपादकीय मंडळाचे अध्यक्ष व माजी खासदार डॉ. विजय दर्डा, महाराष्ट्र शासनाचे माजी कॅबिनेट मंत्री व आमदार सुधीर मुनगंटीवार, सामाजिक कार्यकर्त्या सपना मुनगंटीवार, अभिनेत्री चित्रांगदा सिंग, YPO आफ्रिका रिजनचे चेअर अभयकुमार साळुंखे आणि राठी स्टील अँड मेटल प्रा. लि.चे संचालक उमेश राठी यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

विधी व्यवसायातील व्यावसायिक कौशल्यासोबतच सामाजिक बांधिलकी जपत केलेल्या कार्याची दखल या पुरस्काराच्या माध्यमातून घेण्यात आली. आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर मिळालेल्या या सन्मानामुळे पुण्याच्या विधी क्षेत्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. “हा केवळ आमचा सन्मान नसून, विधी क्षेत्रात एकमेकांना साथ देत आणि नवीन पिढीला दिशा देत केलेल्या सामूहिक प्रवासाची पावती आहे. आमच्या प्रवासात पाठीशी उभे राहणारे सहकारी, मित्र आणि हितचिंतकांचे आम्ही मनापासून आभारी आहोत,” अशी भावना ॲड. विशाल काळे आणि ॲड. पल्लवी काळे यांनी व्यक्त केली.

पान १ वरून...

## २२ लाखांची कार; तरीही मनस्ताप!

ग्राहकाच्या तक्रारीत तथ्य असल्याचे मानले. त्यामुळे कंपनीला ग्राहकाला नवीन, दोषमुक्त वाहन देण्याचे निर्देश देण्यात आले. त्यासाठी संपूर्ण वॉरंटी देण्याचेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

नवीन वाहन देणे शक्य नसल्यास ग्राहकाने भरलेली २२ लाख २४ हजार रुपयांची संपूर्ण खरेदी किंमत व्याजासह परत करावी, असे आयोगाने स्पष्ट केले. यासोबतच ग्राहकाला झालेला मानसिक त्रास, मनस्ताप आणि आर्थिक नुकसान तसेच न्यायालयीन खर्चापोटी एकूण १ लाख १५ हजार रुपये देण्याचे निर्देश देण्यात आले. हा निर्णय अतिरिक्त जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष डॉ. अरुण गायकवाड, सदस्या कांचन गंगाधरे आणि प्रणाली सावंत यांनी दिला.

## आरोपींचे ‘मौन’ ठरले खुनाचा पुरावा!

समाजातील असल्याने गावकऱ्यांनी त्यांना खोटे अडकविल्याचा युक्तिवाद केला. न्यायालयाने हा युक्तिवाद अमान्य केला.

वृद्ध महिला आरोपींच्या घरातच झोपलेली असताना तिच्यावर प्राणघातक हल्ला झाला. गंभीर जखमा झाल्यानंतर तिच्याकडून आरडाओरड किंवा झटापट होणे स्वाभाविक आहे. असे असताना घरात झोपलेल्या आरोपींना हल्ल्याची कोणतीही कल्पना नव्हती, हा दावा विश्वासार्ह नसल्याचे न्यायालयाने नमूद केले.

घरात घडलेल्या घटनेचे समाधानकारक स्पष्टीकरण आरोपींकडून अपेक्षित असताना त्यांनी बाळगलेले मौन हे त्यांच्या विरोधातील प्रबळ परिस्थितीजन्य पुरावा ठरते, असे न्यायालयाने निकालात स्पष्ट केले.

पान १ वरून...

## महसूल न्यायालयांचे स्वतंत्र...

नसल्यामुळे अनेकदा मनमानी, विनाकारण (Unreasoned) आणि घाईघाईत आदेश पारित केले जातात. परिणामी, संबंधित पक्षकारांना योग्य न्याय मिळण्याऐवजी पुढील न्यायालयीन प्रक्रियेचा मार्ग स्वीकारावा लागतो.

### सुधारणांचे तीन प्रमुख आधारस्तंभ

### १. स्वतंत्र महसूल न्यायिक कॅडर

प्रशासकीय आणि न्यायिक कामांची सरमिसळ थांबविण्यासाठी स्वतंत्र महसूल न्यायिक कॅडर (Revenue Judicial Cadre) निर्माण करून प्रशिक्षित न्यायिक अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. त्यामुळे महसूल अधिकाऱ्यांना त्यांच्या प्रशासकीय जबाबदाऱ्यांवर पूर्ण लक्ष केंद्रित करता येईल. दौरे किंवा व्हीआयपी ड्युटीमुळे सुनावण्या रद्द होणार नाहीत आणि न्यायिक कामकाज अविरत सुरू राहील.

### २. स्वतंत्र महसूल न्यायाधिकरण

महसूल लवाद किंवा स्वतंत्र न्यायाधिकरणाची स्थापना करून त्याचे कामकाज नियमित दिवाणी न्यायालयांच्या धर्तीवर चालविणे गरजेचे आहे. पुराव्यांची योग्य नोंद, दोन्ही बाजूंना पूर्ण संधी आणि कारणमीमांसा असलेले गुणवत्तापूर्ण कायदेशीर आदेश यामुळे न्यायप्रक्रियेवरील विश्वास वाढेल.

### ३. डिजिटल व्यवस्थापन आणि कालबद्ध निकाल

सुनावण्या, आदेश आणि निकालांची डिजिटल नोंद ठेवण्याची व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे. प्रकरणांची सुनावणी कोणत्या अधिकाऱ्यासमोर होणार, त्याची तारीख, प्रकरणाची सद्यस्थिती आणि निकाल याबाबत पारदर्शक डिजिटल प्रणाली असावी. यामुळे ‘बेंच हंटिंग’ आणि संशयास्पद आदेशांना आळा बसून पारदर्शकता आणि विश्वासार्हता निर्माण होईल.

### विकसित भारतासाठी कायद्याचे राज्य

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (MLRC), कुळकायदा आणि तुकडेबंदी कायदा यांसारखे विषय सामान्य नागरिकांच्या मालमत्तेच्या मूलभूत अधिकारांशी जोडलेले आहेत. जेव्हा अशा संवेदनशील विषयांवर वेळेत आणि निष्पक्ष न्याय मिळत नाही, तेव्हा नागरिकांचा व्यवस्थेवरील विश्वास उडतो आणि उच्च न्यायालयांवरील रिट याचिकांचा ताण कैक पटींनी वाढतो. महसूल अधिकाऱ्यांकडून न्यायिक अधिकार काढून ते स्वतंत्र, प्रशिक्षित न्यायिक अधिकाऱ्यांकडे (Revenue Judicial Officers) सोपविल्यास दोन मोठे क्रांतिकारी बदल घडतील. पहिला म्हणजे प्रशासनाला गती. महसूल अधिकाऱ्यांना विकासकामे आणि प्रशासनावर पूर्ण लक्ष केंद्रित करता येईल. दुसरा म्हणजे जनतेला जलद आणि निष्पक्ष न्याय. जमिनीच्या तंट्यांचा निकाल तातडीने, कायदेशीर निकषांनुसार आणि निःपक्षपातीपणे लागेल. न्यायव्यवस्थेची प्रतिष्ठा ही तिच्या शिस्तीत, कार्यक्षमतेत आणि निष्पक्षपातीपणात सामावलेली असते. महसूल विभागातील ही ‘अर्ध-न्यायिक थट्टा’ थांबवून तेथे स्वतंत्र न्यायिक व्यवस्थेची स्थापना करणे, हीच कायद्याचे राज्य (Rule of Law) प्रस्थापित करण्याची खरी सुरुवात ठरेल.

### कायदेशीर संशोधन व सर्वेक्षण साहाय्य

हा संपूर्ण अभ्यास आणि निष्कर्षात्मक मांडणी ॲड. दत्तात्रय पवार आणि ॲड. रवी कुंभार यांच्या प्रत्यक्ष कायदेशीर संशोधन, सखोल सर्वेक्षण आणि मौलिक इनपुट्सवर आधारित आहे.

# घरातील खटल्यानेच वकिलीचा 'श्रीगणेशा'

घरात वकिलीची कोणतीही पार्श्वभूमी नसताना एका जमिनीच्या दीर्घकाळ चाललेल्या कौटुंबिक वादाने ॲड. ललितकुमार झुनझुनवाला यांच्या मनात कायद्याची ओढ निर्माण केली. बिहारमधील त्यांच्या कुटुंबाच्या 'बाबू हजारीमल' धर्मशाळेच्या जागेचा वाद आणि त्या जागेशी जोडलेली महात्मा गांधींच्या १९१७ मधील वास्तव्याची आठवण यामुळे वकिलीचा निर्णय पक्का झाला. आज दोन दशकांच्या अनुभवातून ते तरुण वकिलांना एकच सांगतात - "क्लायंटचे जोकर होऊ नका; तुम्ही कोर्ट ऑफिसर आहात. स्वतःच्या व्यवसायाची किंमत कधीही कमी करू नका."

### ✦ 'ती' जागा, 'तो' वाद

"आमच्या घरात कुणीही वकील नाही. मीच पहिला वकील. बिहारमध्ये आमची 'बाबू हजारीमल' नावाची धर्मशाळा होती. १९१७ मध्ये महात्मा गांधी त्या धर्मशाळेत अडीच महिने राहिले होते, असे वडील सांगायचे. बिहारमधील निळेच्या सत्याग्रहाचे नेतृत्व गांधीजींनी केले होते. पुढे त्या धर्मशाळेची जागा देण्याचा आग्रह तत्कालीन काँग्रेस नेत्यांनी केला; मात्र वडिलांनी नकार दिला. त्यानंतर सुरू झालेला जागेचा कायदेशीर वाद अनेक वर्षे सुरू आहे. हा खटला वकिलीच्या क्षेत्रात येण्यामागचे माझ्यासाठी सर्वांत मोठे कारण ठरला."

### ✦ पहिला खटला; शिक्षकच समोर

"मी कुणाकडेही प्रॅक्टिस किंवा ज्युनिअरशीप केली नाही. त्यामागे अभिनिवेश नव्हता. सुरुवातीपासून स्वतंत्र काम करायचे, असा निर्णय होता. चुकलो तरी चालेल; पण स्वतःच्या कामावर विश्वास ठेवायचा, हे ठरवले होते.



ॲड. ललितकुमार झुनझुनवाला

पहिला खटला शिवाजीनगरच्या सिव्हिल बिल्डिंगमध्ये लढलो. पक्षकाराला शेतकऱ्याची जमीन खरेदी करायची होती. व्यवहार ठरला, पैसेही दिले गेले; मात्र शेतकरी खरेदीखत करून देण्यास टाळाटाळ करू लागला. त्या खटल्यात माझ्यासमोर दुसऱ्या बाजूने युक्तिवाद करणारे वकील माझे शिक्षक होते. ज्या सरांनी आम्हाला 'ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी' शिकवले होते, त्यांच्याशी त्याच विषयाच्या खटल्यात युक्तिवाद करण्याची वेळ आली. अखेर प्रकरण परस्पर संमतीने मिटले; पण त्या खटल्याने खूप काही शिकवले."

### ✦ 'चांगली गोष्ट सांगता आली पाहिजे'

"वकील फार वेगळे काम करत नाही. मात्र न्यायाधीशांना आपला मुद्दा व्यवस्थित, पद्धतशीर आणि नेमकेपणाने समजावून सांगण्याची कला त्याला अवगत असावी लागते. साध्या भाषेत तथ्य मांडून त्याला पुराव्यांची जोड देणे महत्त्वाचे आहे. ज्याला चांगली गोष्ट सांगता येते, तो चांगला वकील, अशी माझी व्याख्या आहे. अर्थात ती गोष्ट कायदा आणि पुराव्यांवर आधारित असली पाहिजे. तरुण वकिलांनी न्यायालयातील शिस्त, नियम आणि आचारसंहिता बारकाईने समजून घ्यावी. त्यांचे पालन करावे आणि वरिष्ठांचा आदर ठेवावा."

### ✦ 'न्यायाधीश आपले शत्रू नाहीत'

"आपल्या विरोधात निकाल गेला की न्यायाधीशांचा राग येणे स्वाभाविक आहे. मलाही अनेकदा आला आहे. मात्र नंतर शांतपणे विचार केल्यावर जाणवते की, त्या निर्णयामागचा कायदेशीर विचार वेगळा होता आणि अनेकदा तो योग्यही होता.

माझ्या सहकाऱ्यांना मी नेहमी सांगतो - न्यायाधीशांचा आदर करा. ते आपले शत्रू नाहीत. योग्य न्याय करणे ही त्यांची भूमिका आहे. आपली बाजू प्रभावीपणे मांडणे हे आपले काम."

### ✦ दोन दशकांचा अनुभव

"२०१७ मध्ये एका नामांकित इंग्रजी दैनिकाविरुद्ध फॅशन शोच्या नावावरून निर्माण झालेल्या वादातील खटला चालवण्याची संधी मिळाली. समोर ज्येष्ठ वकील होते. त्या प्रकरणाने माझा चांगलाच कस लावला. अखेर तेही परस्पर संमतीने मिटले. गेल्या दोन दशकांत प्रत्येक खटल्याने काही ना काही शिकवले. तयारी, पुरावे, कागदपत्रांचे वाचन आणि खटल्याचे बारकावे ही निरंतर प्रक्रिया आहे.

आज मागे वळून पाहताना समाधान आहे; मात्र प्रवास अजून बाकी आहे. पक्षकाराला दिलेली 'कमिटमेंट' पाळणे हे ब्रीद मात्र कधीही बदलले नाही."

### ✦ 'नाव नव्हे, मेहनत महत्त्वाची'

"दहावीनंतर पुण्यात आलो. फर्ग्युसन महाविद्यालयात शिक्षण घेतल्यानंतर आय.एल.एस. विधी महाविद्यालयातून एलएलबी पूर्ण केले. नियमित न्यायालयात जाणे, कामकाज पाहणे आणि सातत्याने शिकत राहणे सुरू ठेवले. कुणाकडे न जाता स्वतःच्या बळावर प्रॅक्टिस करता आली. नवोदित वकिलांना अनेकदा नावामागची 'फेम' दिसते; पण त्यामागची मेहनत दिसत नाही. ही शोकांतिका आहे. वकिलीमध्ये सातत्य, शिस्त आणि अभ्यासाला पर्याय नाही."

### ✦ 'वाचनाशिवाय वकिलीचे पान हलत नाही'

"वकिलासाठी वाचन अत्यावश्यक आहे. रामायण आणि महाभारत हे माझ्या आवडीचे ग्रंथ आहेत. मानवी जीवनातील विविध वृत्ती-प्रवृत्ती महाभारतात दिसतात, तर रामायण जगण्याचा मार्ग दाखवते. महाभारत ही युद्धभूमी आहे. या दोन्ही ग्रंथांतून वकिली क्षेत्रालाही मोलाचे मार्गदर्शन मिळते. त्यामुळे त्यांचे अभ्यासपूर्वक वाचन केले पाहिजे."

ॲड. ललितकुमार झुनझुनवाला हे पुण्यातील वकील असून शिवाजीनगर येथील जिल्हा व सत्र न्यायालय तसेच पिंपरी न्यायालयात सिव्हिल क्षेत्रातील खटल्यांमध्ये प्रॅक्टिस करतात.

**- शब्दांकन : ॲड. युगंधर ताजणे**

# न्यायालय कोणासाठी? तारीख देण्यासाठी की न्याय देण्यासाठी?

## न्यायालयीन विलंबाला न्यायाधीश, वकील आणि पक्षकारांची सामूहिक जबाबदारी; 'केस'च्या मागचा माणूस केंद्रस्थानी हवा

"Justice delayed is justice denied" — न्यायाला होणारा अनावश्यक विलंब म्हणजे एका अर्थाने न्याय नाकारणेच. अन्याय झाल्यानंतर सामान्य नागरिक पोलिसांकडे जातो आणि शेवटी न्यायालयाचे दार ठोठावतो. त्याच्या मनात एकच विश्वास असतो— न्यायालय मला न्याय देईल. पण प्रश्न आहे, तो न्याय किती काळाने मिळणार?

न्याय मिळणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच तो योग्य वेळेत मिळणेही आवश्यक आहे. वर्षानुवर्षे सुरू राहणारी सुनावणी, वारंवारच्या तहकूब्या, साक्षीदारांची अनुपस्थिती, पुराव्याची प्रदीर्घ प्रक्रिया आणि निकालाची अनिश्चितता याचा सर्वाधिक फटका पक्षकाराला बसतो. पैसा, वेळ, मानसिक स्वास्थ्य आणि कुटुंबीयांचे आयुष्य या सगळ्याची किंमत त्याला मोजावी लागते.

### ✦ न्यायालय म्हणजे केवळ व्यवस्था नव्हे

न्यायालय ही केवळ न्यायाधीश, वकील आणि कर्मचाऱ्यांची यंत्रणा नाही. तिच्या केंद्रस्थानी पक्षकार आणि त्याला मिळणारा न्याय असला पाहिजे.

जमीन गमावलेला माणूस, अडकलेले पैसे परत मिळविण्यासाठी लढणारा नागरिक, गुन्ह्याचा आरोप असलेली व्यक्ती किंवा खोट्या आरोपाविरुद्ध न्याय मागणारा नागरिक— या प्रत्येकासाठी न्यायालय ही शेवटची आशा असते. त्यामुळे न्यायालयातील प्रत्येक दिवस त्याच्या आयुष्याशी जोडलेला असतो.



**ॲड. मिलिंद दत्तात्रय पवार**
माजी अध्यक्ष, पुणे बार असोसिएशन
माजी सदस्य, विशेषाधिकार समिती, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा

'तारीख मिळाली' हे न्यायाचे उत्तर नाही; 'न्याय मिळाला' हेच अंतिम उत्तर असले पाहिजे.

### ✦ न्यायाधीशांची भूमिका : सुनावणीचे प्रभावी व्यवस्थापन

न्यायाधीशांची जबाबदारी केवळ कायद्याचा अर्थ लावून निर्णय देण्यापुरती मर्यादित नाही. न्यायालयीन कार्यवाही निष्पक्ष, शिस्तबद्ध आणि परिणामकारकपणे पुढे नेणे हीदेखील न्यायाधीशांची महत्त्वाची भूमिका आहे.

अनावश्यक तहकूब्या रोखणे, साक्षीदारांचे परीक्षण वेळेत पूर्ण करणे, पुरावे आणि युक्तिवादासाठी योग्य नियोजन करणे आणि दोन्ही बाजूंना संधी देतानाच खटला अनिश्चित काळ लांबणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

Fair trial म्हणजे केवळ दोन्ही पक्षांना पुरेसा वेळ देणे नव्हे; तर वाजवी वेळेत न्याय्य सुनावणी पूर्ण करणेही त्याचाच भाग आहे.

### ✦ वकील : पक्षकाराचा प्रतिनिधी आणि न्यायालयाचा अधिकारी

न्यायालयीन विलंबासाठी केवळ न्यायालयाला जबाबदार धरणे योग्य नाही. वकिलांचीही तितकीच महत्त्वाची भूमिका आहे. अनावश्यक तहकूब मागणे, पुनरावृत्तीचे युक्तिवाद करणे किंवा किरकोळ प्रक्रियात्मक कारणांमुळे सुनावणी पुढे ढकलणे टाळले पाहिजे.

'Advocate is an officer of the Court' ही केवळ कायद्याच्या पुस्तकातील संकल्पना नाही; ती वकिलीच्या व्यावसायिक नैतिकतेचा आधार आहे.

प्रभावी वकिली म्हणजे अधिक वेळ घेणे नव्हे. कमीत कमी वेळेत, मुद्देसूद आणि परिणामकारक पद्धतीने न्यायालयासमोर आपली बाजू मांडणे हीदेखील उत्कृष्ट वकिली आहे.

### ✦ जलद न्याय म्हणजे घाईचा न्याय नव्हे

वेळेत न्याय देण्याच्या प्रयत्नात निष्पक्ष सुनावणीशी तडजोड होऊ नये. बचावाचा अधिकार, नैसर्गिक न्यायाची तत्त्वे, पुराव्याचे परीक्षण आणि दोन्ही बाजूंची योग्य संधी यांचे संरक्षण आवश्यकच आहे.

मात्र निष्पक्ष सुनावणी आणि अनिश्चित काळ चालणारी सुनावणी यामध्ये मूलभूत फरक आहे.

न्यायालयाने 'fair opportunity' देतानाच 'fair and timely justice' याचीही खात्री करायला हवी.

### ✦ 'पुढची तारीख' ही न्यायाची भाषा बनू नये

आज न्यायव्यवस्थेसमोरील महत्त्वाचे आव्हान म्हणजे case management. प्रत्येक प्रकरण कोणत्या टप्प्यावर आहे, किती साक्ष बाकी आहे, कोणते पुरावे सादर व्हायचे आहेत आणि पुढील तारखेला नेमके काय होणार आहे, याचे स्पष्ट नियोजन असणे आवश्यक आहे.

प्रत्येक सुनावणीला काही ना काही प्रगती झाली पाहिजे—साक्ष नोंदवली गेली पाहिजे, पुरावा हाताळला गेला पाहिजे, युक्तिवाद झाला पाहिजे किंवा आवश्यक आदेश झाला पाहिजे. केवळ तारीख संपली आणि पुढची तारीख मिळाली, या चक्रातून न्यायव्यवस्थेला बाहेर पडावे लागेल.

### ✦ पक्षकाराचीही जबाबदारी

न्यायालयीन शिस्त ही एकतर्फी अपेक्षा असू शकत नाही. पक्षकारांनी आवश्यक कागदपत्रे आणि सूचना वेळेत देणे, वकिलांना सहकार्य करणे आणि न्यायालयीन प्रक्रियेत अनावश्यक अडथळे निर्माण न करणे अपेक्षित आहे.

कारण न्यायालयीन विलंबाची जबाबदारी एका घटकावर टाकून हा प्रश्न सुटणार नाही. न्यायाधीशांनी सुनावणीचे व्यवस्थापन करावे, वकिलांनी न्यायालयीन वेळेचा आदर करावा आणि पक्षकारांनी प्रक्रियेत सहकार्य करावे.

### ✦ शेवटी प्रश्न : न्यायालय कोणासाठी?

न्यायालय न्यायाधीशांसाठी नाही. ते वकिलांसाठीही नाही. न्यायालयीन प्रक्रिया केवळ व्यवस्थेच्या सोयीसाठी तर अजिबात नाही.

न्यायालय सर्वप्रथम त्या पक्षकारासाठी आहे, जो न्यायाच्या आशेने तेथे येतो.

त्याला न्याय निष्पक्ष हवा, कायद्यानुसार हवा आणि त्याच्या आयुष्यात अर्थपूर्ण ठरेल अशा वेळेत हवा. न्यायव्यवस्थेवरील लोकांचा विश्वास टिकवायचा असेल, तर केवळ 'न्याय मिळतो' एवढे पुरेसे नाही. नागरिकाला असेही जाणवले पाहिजे की 'माझे म्हणणे ऐकले जात आहे, माझ्या वेळेची किंमत आहे आणि मला अनिश्चित काळ प्रतीक्षा करावी लागणार नाही.'

न्यायव्यवस्थेची खरी कसोटी केवळ निकालांच्या संख्येत नाही; न्याय मिळाल्यानंतर पक्षकाराच्या मनात निर्माण होणाऱ्या विश्वासात आहे.

म्हणून प्रत्येक न्यायाधीश, प्रत्येक वकील आणि न्यायव्यवस्थेशी संबंधित प्रत्येकाने स्वतःला एक प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे—

### ✦ "आपण न्यायालय चालवत आहोत की न्याय देत आहोत?"

३६ वर्षांच्या वकिली आणि न्यायालयीन कामकाजातील अनुभवातून मला वाटते की या प्रश्नाचे प्रामाणिक उत्तर शोधल्याशिवाय न्यायालयीन विलंबाचा प्रश्न सुटणार नाही.

DEVELOPED NATIONS
डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज

# न्यायाच्या पायऱ्यांपासून डिजिटल पडद्यापर्यंत!

## एम. जे. श्रीकांत यांच्या वाटचालीतून बदलत्या पत्रकारितेचा, न्यायव्यवस्थेचा आणि संवादशक्तीचा वेध

याच संक्रमणाच्या वळणावर एम. जे. श्रीकांत यांची वाटचाल पाहिली तर कायदा, न्यायव्यवस्था, पत्रकारिता, जनसंपर्क, माध्यम-व्यवस्थापन आणि डिजिटल संवाद यांच्या संगमावर उभे राहणारे एक नवे माध्यमविश्व दिसते. रणनीतीकार म्हणून काम करताना, पुणे बार अँड बेंच न्यूज एलएलपीमध्ये वरिष्ठ व्यवस्थापकीय भागीदार व व्यवस्थापकीय संपादक म्हणून तसेच MJSPR Pvt. Ltd. चे व्यवस्थापकीय संचालक म्हणून जबाबदारी सांभाळताना त्यांच्या कार्याचा व्यापक अर्थ केवळ पदनामात नाही. माहितीला अर्थ देणे, संवादाला दिशा देणे आणि विश्वासाला केंद्रस्थानी ठेवणे, ही या वाटचालीची महत्त्वाची बाजू मानता येते.

पत्रकारितेचा इतिहास उलगडला तर प्रत्येक माध्यमक्रांतीने एक नवा प्रश्न जन्माला घातला आहे. भारतात जेम्स ऑगस्टस हिकीने १७८० मध्ये 'बंगाल गॅझेट' सुरू केले, तेव्हा छापील शब्दाने सत्तेला प्रश्न विचारण्याची नवी शक्यता निर्माण केली. पुढे लोकमान्य टिळकांच्या 'केसरी'ने वृत्तपत्राला लोकजागृतीचे प्रभावी साधन बनवले. महात्मा गांधींनी 'यंग इंडिया' आणि 'हरिजन'मधून पत्रकारितेला नैतिकता, सामाजिक जबाबदारी आणि सार्वजनिक संवादाची दिशा दिली.

त्या काळात माहितीचा वेग मर्यादित होता; परंतु शब्दाचा प्रभाव मोठा होता. आज परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. माहिती अमर्याद झाली; पण विश्वासाचे महत्त्व अधिक वाढले आहे.

एका क्लिकवर देश-विदेशातील हजारो बातम्या समोर येतात. सोशल मीडियामुळे प्रत्येक व्यक्ती माहिती प्रसारित करू शकते. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे मजकूर, चित्रे, आवाज आणि व्हिडीओ काही क्षणांत तयार होऊ शकतात. पण या माहितीच्या महासागरात सत्य कोणते, संदर्भ कोणता आणि हेतू कोणता, हे ओळखणे दिवसेंदिवस कठीण होत आहे.

म्हणूनच पत्रकारितेची भूमिका कमी झालेली नाही; उलट तिची जबाबदारी वाढली आहे. बातमी देणे सोपे झाले; बातमीचा अर्थ सांगणे कठीण झाले.

विशेषतः न्यायालयीन पत्रकारितेत ही जबाबदारी अधिक गंभीर आहे. न्यायालयाचा निर्णय हा केवळ 'निकाल' नसतो. त्या निर्णयामागे नागरिकाचे स्वातंत्र्य, मालमत्तेचा अधिकार, पर्यावरणाचा प्रश्न, अभिव्यक्तिस्वातंत्र्य, उद्योगाचे हित किंवा शासनाच्या निर्णयावर न्यायालयीन नियंत्रण यांसारखे अनेक व्यापक प्रश्न असू शकतात.

सामान्य वाचकाला न्यायालयीन आदेशातील कायदेशीर भाषा सहज समजेलच असे नाही. त्यामुळे न्यायालयीन बातमी म्हणजे केवळ कोण जिंकले आणि कोण हरले, एवढे सांगणे नव्हे. न्यायालयाने काय म्हटले आणि त्याचा समाजावर काय परिणाम होणार आहे, हे सांगणे अधिक महत्त्वाचे.

'बार अँड बेंच'शी निगडित पत्रकारितेचे महत्त्व याच ठिकाणी अधोरेखित होते. कायद्याच्या

**समाज बदलतो, तंत्रज्ञान बदलते, सत्तेची केंद्रे बदलतात आणि त्याबरोबर संवादाची माध्यमेही बदलतात. मात्र समाजाला प्रश्न विचारण्याची आणि सत्तेला उत्तरदायी धरण्याची गरज कधीच बदलत नाही. छापखान्याच्या काळापासून डिजिटल पडद्यापर्यंत पत्रकारितेचा झालेला प्रवास हा केवळ तंत्रज्ञानाचा इतिहास नाही; तो लोकशाहीच्या सार्वजनिक विवेकाचा इतिहास आहे.**



गुंतागुंतीला सामान्य नागरिकांच्या भाषेत आणणे, न्यायालयीन प्रक्रियेचा संदर्भ स्पष्ट करणे आणि एखाद्या निर्णयाचे व्यापक सामाजिक परिणाम समजावून सांगणे ही माध्यमांची सार्वजनिक जबाबदारी आहे.

भारतीय राज्यघटनेने विधिमंडळ, कार्यपालिका आणि न्यायपालिका यांच्यातील संतुलनाची व्यवस्था निर्माण केली. पत्रकारिता या संस्थांच्या कामकाजावर प्रश्न उपस्थित करणाऱ्या लोकशाहीच्या सार्वजनिक विवेकाचा भाग आहे. म्हणून कायदा आणि पत्रकारिता हे एकमेकांचे प्रतिस्पर्धी नसून लोकशाहीच्या आरोग्याचे परस्परपूरक आधार आहेत.



एम. जे. श्रीकांत
व्यवस्थापकीय संपादक

इतिहासात पाहिले तर कायद्याचे राज्य आणि सार्वजनिक संवाद यांचा संबंध फार जुना आहे. मॅग्ना कार्टाने राजसत्तेलाही कायद्याच्या चौकटीत आणण्याचा विचार पुढे केला. आधुनिक लोकशाहीने त्याला संस्थात्मक रूप दिले. भारताने संविधानाच्या माध्यमातून नागरिकांचे मूलभूत अधिकार आणि संस्थात्मक संतुलन यांना सर्वोच्च स्थान दिले. परंतु एकविसाव्या शतकातील न्यायव्यवस्थेसमोरचे प्रश्न पारंपरिक चौकटींपलीकडे गेले आहेत. सायबर गुन्हे, डिजिटल पुरावे, डेटा गोपनीयता, कृत्रिम बुद्धिमत्ता, ऑनलाइन आर्थिक फसवणूक, पर्यावरणीय न्याय, आर्थिक गुन्हे आणि सीमापार व्यवहार यांनी कायद्याचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे केले आहे.

गुन्हेगार एका देशात बसून दुसऱ्या देशातील नागरिकाची फसवणूक करू शकतो. पैसा काही सेकंदांत सीमापार जाऊ शकतो. बनावट छायाचित्र किंवा व्हिडीओ वास्तविक वाटू शकतो. अशा परिस्थितीत तपास, न्याय आणि पत्रकारिता या तिन्ही क्षेत्रांना तंत्रज्ञानाच्या वेगाशी जुळवून घ्यावे लागणार आहे.

येथेच श्रीकांत यांच्या कार्याचा संदर्भ महत्त्वाचा ठरतो. कायदा आणि माध्यम यांच्या परस्परसंबंधाला समजून घेणाऱ्या पत्रकारितेला केवळ न्यायालयीन परिसरापुरते मर्यादित ठेवता येणार नाही. आज न्यायालयीन बातमीचा परिणाम समाजमाध्यमांवर होतो; समाजमाध्यमांवरील चर्चेचा परिणाम सार्वजनिक मतावर होतो; सार्वजनिक मताचा परिणाम धोरणांवर होतो आणि धोरणांना पुन्हा न्यायालयीन आव्हान दिले जाऊ शकते.

हे एक अखंड माहितीचक्र आहे. या माहितीचक्रात वेग महत्त्वाचा असला तरी विवेक त्याहून महत्त्वाचा आहे.

पुण्यासारख्या शहरात या संवादाची गरज अधिक तीव्रतेने जाणवते. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, लोकमान्य टिळक आणि न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या विचारपरंपरेपासून आधुनिक शिक्षण, उद्योग, माहिती-तंत्रज्ञान आणि स्टार्टअप संस्कृतीपर्यंत पुणे हे महाराष्ट्राच्या सार्वजनिक विचारविश्वातील महत्त्वाचे केंद्र राहिले आहे.

म्हणूनच पुण्यातील न्यायव्यवस्था, माध्यमे, उद्योग, प्रशासन आणि नागरिक समाज यांच्यातील संवाद अधिक तथ्याधारित आणि चिकित्सक होणे ही काळाची गरज आहे. नागरी सुविधा, वाहतूक, पर्यावरण, जमीन व्यवहार, औद्योगिक विकास, सायबर गुन्हे, शिक्षण आणि नवतंत्रज्ञान—या प्रत्येक प्रश्नामागे कायदा आणि सार्वजनिक धोरणाचे अनेक पदर आहेत.

याच ठिकाणी माध्यम-व्यवस्थापनाची नवी भूमिका समोर येते. पूर्वी संपादकाच्या टेबलावर बातम्या येत असत. आज बातम्या मोबाईलच्या पडद्यावर जन्म घेतात. पूर्वी संपादक बातमी प्रसिद्ध करायची की नाही, हे ठरवत असे. आज अल्गोरिदम ठरवतो की कोणता मजकूर किती लोकांपर्यंत पोहोचणार.

पूर्वी वाचक दुसऱ्या दिवशी पत्र लिहून प्रतिक्रिया देत असे; आज तो काही सेकंदांत प्रतिक्रिया देतो. त्यामुळे आजचा संपादक केवळ शब्दांचा कारागीर राहिलेला नाही; तो विश्वासाचा व्यवस्थापक झाला आहे.

माध्यम-रणनीती म्हणजे केवळ व्यावसायिक वाढ नव्हे. कोणता प्रश्न समाजाच्या केंद्रस्थानी आणायचा, कोणत्या विषयामागे खोलवर जायचे, माहितीची पडताळणी कशी करायची, कोणत्या भाषेत ती सांगायची आणि वाचकाचा विश्वास कसा टिकवायचा—या सर्वांचा समन्वय म्हणजे माध्यम-रणनीती.

'ब्रेकिंग न्यूज'च्या स्पर्धेत संदर्भ हरवण्याचा धोका वाढला आहे. न्यायालयीन निकालातील एखादे वाक्य व्हायरल होते; परंतु त्या निर्णयामागील कायदेशीर भूमिका समजून घेण्याची संधी वाचकाला मिळत नाही. राजकीय विधानाचे शीर्षक गाजते; पण त्यातील तथ्य तपासले जात नाही. एखादा व्हिडीओ लाखो लोक पाहतात; पण तो खरा आहे की कृत्रिमरीत्या तयार केलेला, हा प्रश्न नंतर समोर येतो.

म्हणून आजच्या संपादकाची खरी कसोटी अशी असावी—तो किती बातम्या देतो यापेक्षा, कोणती माहिती देऊ नये हे त्याला किती चांगले समजते? कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात हा प्रश्न आणखी गंभीर होणार आहे. मशीन माहिती गोळा करू शकते. अल्गोरिदम मजकूर तयार करू शकतो. हजारो कागदपत्रांचे विश्लेषण काही क्षणांत होऊ शकते. पण अन्याय ओळखण्याची संवेदना, सत्तेला अस्वस्थ करणारा प्रश्न विचारण्याचे धैर्य आणि समाजहिताचा निर्णय घेण्याची नैतिक जबाबदारी अजूनही माणसाचीच आहे.

त्यामुळे भविष्यातील पत्रकारिता 'माणूस विरुद्ध मशीन' अशी नसून 'माणूस आणि मशीन' यांच्यातील जबाबदार भागीदारी अशी असली पाहिजे. माध्यम हे केवळ बाजारपेठेतील उत्पादन नाही; ते लोकशाहीचे सार्वजनिक भांडवल आहे. वाचकाला आकर्षित करणे आवश्यक आहे; पण त्याला उत्तेजित करून नव्हे, जागृत करून. बातमी व्हायरल होणे महत्त्वाचे आहे; पण सत्याची किंमत मोजून नव्हे. कायद्याची माहिती देणे आवश्यक आहे; पण कायद्याला सनसनाटी राजकारणाचे रूप न देता.

याच पार्श्वभूमीवर श्रीकांत यांची वाटचाल केवळ एका व्यक्तीची व्यावसायिक कारकीर्द म्हणून न पाहता बदलत्या माध्यमविश्वाच्या संक्रमणाचे उदाहरण म्हणून पाहता येते. कायदा, पत्रकारिता, जनसंपर्क, डिजिटल तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन यांच्यातील भिंती झपाट्याने कमी होत आहेत. या नव्या वास्तवात माध्यमांना केवळ वेगवान नव्हे, तर विश्वासार्ह, संदर्भपूर्ण आणि जबाबदार बनविण्याचे आव्हान आहे.

हिकीच्या 'बंगाल गॅझेट'पासून टिळकांच्या 'केसरी'मार्गे गांधींच्या वैचारिक पत्रकारितेपर्यंत आणि तेथून आजच्या डिजिटल माध्यमविश्वापर्यंत माध्यमांची साधने बदलली; छापखान्याचा आवाज डिजिटल नोटिफिकेशनमध्ये बदलला, कागदाचा पडदा मोबाईलच्या स्क्रीनने घेतला. पण पत्रकारितेचा मूलभूत प्रश्न बदलला नाही—सत्य कोण सांगणार आणि सत्तेला प्रश्न कोण विचारणार? आज माहितीचा वेग अभूतपूर्व आहे; पण त्या वेगाला विवेकाची जोड नसेल तर माहितीचे रूपांतर दिशाभूल करणाऱ्या गोंधळात होऊ शकते. कृत्रिम बुद्धिमत्ता मजकूर निर्माण करू शकते, अल्गोरिदम माहितीचा प्रसार करू शकतो; पण सत्य-असत्यातील सीमारेषा ओळखण्याची आणि समाजाच्या हितासाठी योग्य प्रश्न उपस्थित करण्याची जबाबदारी माणसाचीच राहणार आहे.



म्हणूनच एम. जे. श्रीकांत यांच्या वाटचालीकडे केवळ माध्यम-व्यवस्थापनाच्या चौकटीत पाहणे अपुरे ठरेल. न्यायव्यवस्था, पत्रकारिता, कायदा, जनसंपर्क, डिजिटल तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन यांच्या संगमावर उभे राहून बदलत्या माध्यमविश्वाला विश्वासाची नवी दिशा देण्याचे आव्हान आज अधिक मोठे आहे.

माध्यमाचा प्रभाव त्याच्या आवाजाच्या मोठेपणात नसतो; समाजाला विचार करायला भाग पाडणाऱ्या प्रश्नांच्या खोलीत असतो.

शब्द बदलतील, माध्यमे बदलतील, तंत्रज्ञान बदलेल; पण समाजाला सत्याचा शोध घेणाऱ्या पत्रकारितेची गरज कधीच संपणार नाही. लोकशाहीला माहितीपेक्षा सत्याची, आवाजापेक्षा विवेकाची आणि वेगापेक्षा विश्वासाची गरज असते. शब्द जिवंत राहोत, सत्याचा दीप तेवत राहो; सत्तेच्या सावलीतही विवेकाचा स्वर घुमत राहो.

माध्यमे वेगवान असोत, पण विश्वास न ढळो; जनतेच्या प्रश्नांतून लोकशाहीचा श्वास जिवंत राहो!

# वर्गणी आधी, धर्मादायची परवानगी आधी ! : ॲड. शिवराज कदम जहागिरदार

## विनापरवानगी निधी संकलन केल्यास तीन महिने कारावास; जमा रकमेच्या दीडपट दंडाची तरतूद....

दहीहंडी, गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, दिवाळी पहाट यांसह सार्वजनिक कार्यक्रमांसाठी वर्गणी, देणगी अथवा प्रायोजकांकडून निधी गोळा करण्यापूर्वी धर्मादाय कार्यालयाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था कायद्यातील कलम ४१ क नुसार ही परवानगी आवश्यक असून, त्याचे उल्लंघन केल्यास कलम ६६ क नुसार तीन महिन्यांपर्यंत साध्या कारावासाची तसेच विनापरवानगी जमा केलेल्या रकमेच्या दीडपट दंडाची तरतूद आहे. त्यामुळे आगामी सार्वजनिक उत्सवांच्या पार्श्वभूमीवर मंडळांनी निधी संकलन करताना कायदेशीर नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे, असे ॲड. शिवराज कदम जहागिरदार यांनी स्पष्ट केले.



ॲड. शिवराज कदम जहागिरदार

सार्वजनिक उत्सवांच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर वर्गणी, देणगी आणि प्रायोजकांकडून आर्थिक मदत घेतली जाते. मात्र, धर्मादाय कार्यालयाची परवानगी न घेता निधी संकलन केल्यास संबंधित व्यक्ती अथवा मंडळ अडचणीत येऊ शकते. अशा प्रकारे जमा केलेल्या वर्गणीबाबत तक्रार झाल्यास दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागू शकते. तसेच इतर आवश्यक परवाने मिळवितानाही धर्मादाय कार्यालयाची परवानगी प्राथमिक ठरणार आहे.

धर्मादाय आयुक्तांकडे कायमस्वरूपी नोंदणीकृत असलेल्या मंडळांना निधी संकलनासाठी स्वतंत्र परवानगी घेण्याची आवश्यकता नाही. मात्र, अशा संस्थांनी त्यांच्या नोंदणीशी संबंधित कागदपत्रे अद्ययावत ठेवणे आणि सर्व आर्थिक वर्षांची हिशोबपत्रके ऑनलाइन दाखल करणे आवश्यक आहे.

नोंदणीकृत नसलेल्या मंडळे व संस्थांनी निधी संकलनासाठी ट्रस्ट कायद्याच्या कलम ४१ क अन्वये धर्मादाय विभागाच्या संकेतस्थळावर विहित नमुन्यात ऑनलाइन अर्ज करणे आवश्यक आहे. अर्जामध्ये समिती सदस्यांची पूर्ण नावे, पत्ते, संपर्क क्रमांक तसेच निधी कोणत्या कारणासाठी संकलित केला जाणार आहे, याची माहिती द्यावी लागते. परवानगी मिळाल्यानंतर मिळालेला नोंदणी क्रमांक किंवा अनुक्रमांक छापील पावतीवर नमूद करणे आणि निधी स्वीकारताना देणगीदाराला पावती देणे बंधनकारक आहे.

कार्यक्रम संपल्यानंतर जमा झालेला निधी आणि झालेला खर्च याचा संपूर्ण हिशोब लेखापरीक्षकाच्या अभिप्रायासह संबंधित धर्मादाय कार्यालयात निर्धारित कालावधीत सादर करावा लागतो. उर्वरित रक्कम धर्मादाय कार्यालयाच्या प्रशासन निधीत जमा करण्याची तरतूद आहे. "सार्वजनिक उत्सव साजरा करताना मंडळांनी निधी संकलनासंदर्भातील बदललेल्या दंडात्मक तरतुदींचे भान ठेवणे गरजेचे आहे. वर्गणीच्या अफरातफरीबाबत तक्रार झाल्यास त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात," असा इशारा ॲड. शिवराज कदम जहागिरदार, माजी अध्यक्ष, पब्लिक ट्रस्ट प्रॅक्टिशनर्स असोसिएशन, पुणे यांनी दिला. उत्सवाची परंपरा आणि सामाजिक एकोपा जपत असताना वर्गणीच्या पैशांमध्ये पारदर्शकताही तितकीच महत्त्वाची आहे. त्यामुळे 'आधी वर्गणी, नंतर कागदपत्रे' अशी पद्धत न स्वीकारता 'आधी धर्मादायची परवानगी, मग निधी संकलन' हा नियम मंडळांनी पाळणे आवश्यक आहे.

# चिमुकली गेली; कुटुंबाच्या वेदनेला 'मनोधैर्या'चा आधार

**डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज**
developednationslaw@gmail.com

**पुणे :** जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी येथे लैंगिक अत्याचारानंतर हत्या झालेल्या साडेनऊ वर्षांच्या चिमुकलीच्या कुटुंबाच्या दुःखावर न्यायव्यवस्थेने संवेदनशीलतेची फुंकर घातली आहे. पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने 'मनोधैर्य योजने'तून पीडितेच्या आई-वडिलांना दहा लाख रुपयांची आर्थिक मदत मंजूर केली आहे. गुन्ह्यानंतर अवघ्या सात दिवसांत मदतीचा निर्णय झाल्याने संकटात सापडलेल्या कुटुंबाला तातडीचा आधार मिळणार आहे.

पिंपळवंडी येथे १८ ऑगस्टला साडेनऊ वर्षांच्या बालिकेवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या करण्यात आली. या घटनेने परिसर हादरला. कुटुंबावर कोसळलेल्या या असह्य आघातानंतर त्यांच्या पुनर्वसनासाठी प्रशासन आणि न्यायव्यवस्थेने हालचाली सुरू केल्या.

पुणे न्यायालयाच्या प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांनी सोमवारी पदभार स्वीकारल्यानंतर पहिल्याच दिवशी या प्रकरणाची माहिती घेतली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन संबंधित अधिकाऱ्यांची तातडीने बैठक घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर पीडित कुटुंबाला मनोधैर्य योजनेतून मदत देण्याचा निर्णय झाला.

कायदेशीर लढ्यासोबत मानसिक आधारही गरजेचा चिमुकलीला गमावलेल्या कुटुंबाला न्यायालयीन लढाईसोबतच मानसिक आणि आर्थिक आघातालाही सामोरे जावे लागणार आहे. त्यामुळे मिळणारी मदत केवळ आर्थिक भरपाई न ठरता पुनर्वसनाचा आधार ठरणे अपेक्षित आहे. या प्रकरणी आळेफाटा पोलिस ठाण्यात पोक्सो कायदा आणि खुनाच्या कलमांनुसार गुन्हा दाखल आहे. आरोपीला ३१ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

"अशा संवेदनशील प्रकरणांत पीडित कुटुंबाला तातडीने आर्थिक मदतीसोबत कायदेशीर संरक्षण आणि मानसिक आधार मिळणे आवश्यक आहे. पुनर्वसनाच्या प्रक्रियेत न्यायव्यवस्था कुटुंबाच्या पाठीशी आहे," असे विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव न्यायाधीश रेवती देशपांडे यांनी सांगितले.

### 'मनोधैर्य'चा आधार कशासाठी?

लैंगिक अत्याचार, बलात्कार, ॲसिड हल्ला तसेच पोक्सो कायद्यातील गंभीर गुन्ह्यांतील पीडितांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना 'मनोधैर्य योजने'तून आर्थिक मदत दिली जाते. उपचार, पुनर्वसन आणि अत्याचारामुळे मृत्यू झालेल्या पीडितांच्या कुटुंबाला आर्थिक आधार देण्याचीही या योजनेत तरतूद आहे.

# MPSC प्रश्नसंच फुटला; चौघांना अटक

**डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज**
developednationslaw@gmail.com

**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) परीक्षेतील गोपनीय प्रश्नसंच बेकायदेशीररीत्या मिळवून त्याची प्रत इतरांना उपलब्ध करून दिल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी आयोगातील तीन अधिकारी आणि खासगी अकादमीच्या संचालकासह चौघांना मुंबई गुन्हे शाखेने अटक केली आहे. त्यामुळे स्पर्धा परीक्षांच्या पारदर्शकतेवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.




२२ मार्च २०२६ रोजी झालेल्या परीक्षेसाठी तज्ज्ञांनी तयार केलेल्या प्रश्नसंचातील प्रश्न बेकायदेशीररीत्या मिळविण्यात आले. त्यातून स्वतंत्र प्रश्नसंच तयार करून तो इतर व्यक्तींना पुरविल्याचे तपासात निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकारामुळे आयोगाच्या गोपनीय परीक्षा प्रक्रियेचा भंग झाल्याचा आरोप आहे.

गुन्हे शाखेच्या गुन्हे अन्वेषण, मालमत्ता कक्षाने दाखल केलेल्या गुन्ह्यात विश्वेश्वर दत्तात्रय नकाते (सहाय्यक कक्ष अधिकारी), अभिजित गणपतराव लेंडवे (अवर सचिव), गोपाळ भट्टू मराठे (सहाय्यक कक्ष अधिकारी) या MPSC अधिकाऱ्यांसह प्रविण दिलीप पाटील (संचालक, कौटिल्य अकादमी, नंदुरबार) यांना अटक करण्यात आली.

या प्रकरणात अमृत नामदेव पाटील आणि लोकेश ऊर्फ गौरव राजेंद्र पाटील यांचाही सहभाग निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

अटक आरोपींना सत्र न्यायालयातील न्यायालय क्रमांक चारसमोर हजर केले असता, १ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली.

सहाय्यक पोलीस आयुक्त सदानंद राणे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

प्रश्नपत्रिकेची गोपनीयता हीच परीक्षेच्या विश्वासार्हतेची पहिली अट आहे. तीच भेदली गेल्याने या प्रकरणातील संपूर्ण साखळी आणि प्रश्नसंच कुणाकुणापर्यंत पोहोचला, याचा तपास महत्त्वाचा ठरणार आहे.

# भरधाव कार ओढ्यात कोसळली; दोघांचा मृत्यू

**पुणे :** जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर पहाटेच्या काळोखात भरधाव कार अनियंत्रित होऊन दुभाजकाला धडकून ओढ्यात कोसळल्याने पुण्यातील दोन तरुणांचा जागीच मृत्यू झाला. हा भीषण अपघात गुरुवारी पहाटे सव्वाचारच्या सुमारास कार्ला फाट्याजवळील वाकसई गावाच्या हद्दीत घडला. हुसेन शब्बीर गोधरावाला (२७, कोंढवा) आणि आसीर असगरअली इनामदार (२६, नेहरूनगर) अशी मृतांची नावे आहेत. कारचालक अनिकेत गौतम बरवा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. लोणावळा ग्रामीण पोलिसांच्या माहितीनुसार, पहाटे अनिकेत कार घेऊन जात असताना भरधाव वेगामुळे त्याचा वाहनावरील ताबा सुटला. कार दुभाजकावर आदळल्यानंतर रस्त्यालगतच्या ओढ्यात कोसळली. धडक इतकी भीषण होती की कारचे मोठे नुकसान झाले. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. हुसेन आणि आसीर यांना गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर जखमी चालकाला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. या प्रकरणी लोणावळा ग्रामीण पोलीस ठाण्याचे हवालदार गोकुळ भास्कर खेडकर यांच्या फिर्यादीवरून निष्काळजीपणे आणि भरधाव वेगाने वाहन चालवून अपघातास कारणीभूत ठरल्याप्रकरणी चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मुलीच्या बदललेल्या वागण्यातून अत्याचार उघड; आजोबाला जन्मठेप

**डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज**
developednationslaw@gmail.com

**पुणे :** मुलीच्या वागण्यात झालेला बदल आईच्या लक्षात आला आणि तिने विश्वासाने संवाद साधला. त्यातून कुटुंबातीलच व्यक्तीकडून तिच्यावर होत असलेल्या अत्याचाराचा धक्कादायक प्रकार उघड झाला. या प्रकरणात वडगाव मावळ येथील विशेष पोक्सो न्यायालयाने ६१ वर्षीय आजोबाला जन्मठेपेची शिक्षा सुनावली असून, ७० हजार रुपयांचा दंडही ठोठावला आहे. विशेष न्यायाधीश दत्तात्रेय अनभुले यांनी हा निकाल दिला.

एप्रिल ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीत हा प्रकार घडला. मुलीचे आई-वडील कामानिमित्त बाहेर गेल्यानंतर आरोपी घरी येत असे. घरातील अन्य लहान मुलांना टीव्ही पाहण्यासाठी किंवा खेळण्यासाठी बाहेर पाठवून आरोपी मुलीवर अत्याचार करीत असल्याचे तपासात निष्पन्न झाले.

सुरुवातीला हा प्रकार कुटुंबीयांच्या लक्षात आला नव्हता. मात्र मुलीच्या वागण्यात बदल जाणवल्यानंतर आईने तिची विचारपूस केली. त्यावेळी मुलीने घडलेला प्रकार सांगितल्यानंतर आईने देहूरोड पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी आरोपीला अटक करून तपास पूर्ण केल्यानंतर आरोपपत्र दाखल केले.

### पीडितेची साक्ष ठरली निर्णायक

तत्कालीन सहायक निरीक्षक अनिता दुगावकर यांनी तपास केला. सुनावणीदरम्यान पीडित मुलीने न्यायालयात धैर्याने साक्ष दिली. तिच्या साक्षीला आईची साक्ष, वैद्यकीय अधिकाऱ्यांचे पुरावे आणि तपास अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या पुराव्यांची जोड मिळाली. विशेष सरकारी वकील संतोष परदेशी आणि ॲड. लालचंद ओसवाल यांनी सरकारी पक्षातर्फे पाच साक्षीदार तपासले.

### 'खोट्या आरोपांचा' बचाव फेटाळला

आर्थिक फायदा मिळविण्यासाठी आरोपीला खोट्या प्रकरणात गोवण्यात आल्याचा दावा बचाव पक्षाने केला. मात्र न्यायालयाने हा दावा फेटाळून लावला.

मुलीचे भविष्य आणि तिच्या वैवाहिक आयुष्यावर परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेता, कुटुंबीय अशा गंभीर स्वरूपाचे खोटे आरोप करतील, हा बचाव स्वीकारता येणार नाही, असे न्यायालयाने नमूद केले.

नातेसंबंधातील विश्वासाचा गैरफायदा घेत आरोपीने गुन्हा केल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले. जन्मठेपेसोबत ठोठावलेला ७० हजार रुपयांचा दंड पीडित मुलीला नुकसानभरपाई म्हणून देण्याचे निर्देश न्यायालयाने दिले.

# १६२ वर्षे समानता कुठे होती?

## कायद्याच्या दालनात महिलांना नेतृत्वाची संधी; एएडब्ल्यूआयचा ऐतिहासिक निर्णय

डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज
developednationslaw@gmail.com

**मुंबई :** कायद्याच्या राज्याची आणि समानतेची भाषा करणाऱ्या न्यायव्यवस्थेच्या दालनातच महिलांना नेतृत्वाची संधी मिळण्यासाठी १६२ वर्षे का लागली? हा प्रश्न मुंबई उच्च न्यायालयातील वकिलांची १८६४ मध्ये स्थापन झालेली ॲडव्होकेट्स असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडिया (एएडब्ल्यूआय) आजच्या निर्णयामुळे उपस्थित करते. तब्बल १६२ वर्षांच्या इतिहासात या संघटनेच्या अध्यक्षपदावर एकही महिला विराजमान झालेली नाही. आता पुढील निवडणुकीपासून अध्यक्षपद महिलांसाठी राखीव करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, प्रत्येक तीन कार्यकाळांत एकदा महिला वकील या सर्वोच्च पदावर विराजमान होणार आहे.



हा निर्णय केवळ एका पदाचे आरक्षण नाही; तो न्यायाच्या व्यवसायातील प्रतिनिधित्वाच्या दीर्घकाळच्या असमतोलावर ठेवलेला प्रश्नचिन्ह आहे. कायद्याच्या पुस्तकात समानतेचे तत्त्व स्पष्टपणे लिहिलेले असताना प्रत्यक्ष संस्थात्मक नेतृत्वात ते उतरायला दीड शतकाहून अधिक काळ का गेला, याचे उत्तर शोधण्याची वेळ आली आहे.

महिलांचा न्यायव्यवस्थेतील सहभाग आज वाढला आहे. त्या न्यायालयात युक्तिवाद करतात, सरकारी पक्षाचे प्रतिनिधित्व करतात, मध्यस्थी करतात, कायद्याचा अभ्यास करतात आणि न्यायव्यवस्थेच्या विविध पातळ्यांवर जबाबदाऱ्या सांभाळतात. तरीही नेतृत्वाच्या सर्वोच्च पदावर त्यांची अनुपस्थिती राहिली. त्यामुळे प्रश्न महिलांच्या क्षमतेचा नाही; संधीच्या रचनेचा आहे.

एएडब्ल्यूआयने यापूर्वी २०१८ मध्ये उपाध्यक्षपद आणि कार्यकारी मंडळातील दोन जागा महिलांसाठी राखीव केल्या होत्या. आता अध्यक्षपदाबरोबरच सचिव, संयुक्त सचिव आणि कार्यकारी मंडळातील सदस्यांच्या पदांमध्येही महिलांच्या प्रतिनिधित्वाची तरतूद करण्याचा निर्णय झाला आहे. म्हणजेच हा बदल केवळ प्रतीकात्मक नसून संघटनेच्या निर्णयप्रक्रियेत महिलांचा सहभाग संस्थात्मक करण्याच्या दिशेने टाकलेले पाऊल आहे.

आरक्षणावर 'गुणवत्ता'चा प्रश्न उपस्थित केला जातो. पण समानतेचा अर्थ केवळ सर्वांना एकाच रांगेत उभे करणे नाही; ज्यांना ऐतिहासिकदृष्ट्या नेतृत्वाच्या दारापासून दूर ठेवले गेले, त्यांना त्या दारापर्यंत पोहोचण्याची संधी देणेही समानतेचाच भाग आहे. महिला अध्यक्ष होणे म्हणजे पुरुष वकिलांचा पराभव नव्हे; तो संस्थेच्या लोकशाहीचा विस्तार आहे.

या निर्णयाचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याचा संदेश. न्यायालयात महिलांनी न्यायासाठी युक्तिवाद करावा आणि त्याच वेळी न्यायालयीन व्यावसायिक संस्थांचे नेतृत्व मात्र त्यांच्या आवाक्याबाहेर राहावे, ही विसंगती आता टिकू शकत नाही.

१६२ वर्षांची प्रतीक्षा संपवणारा हा निर्णय अभिनंदनीय आहे; पण त्याचवेळी तो अस्वस्थ करणारा प्रश्नही विचारतो—समानतेचा घटनात्मक आदर्श स्वीकारलेल्या देशात संस्थात्मक समानतेला इतका वेळ का लागतो?

एखाद्या महिलेला अध्यक्षपद मिळणे हा अंतिम टप्पा नाही. खरा बदल तेव्हा घडेल, जेव्हा नेतृत्वासाठी महिलांना 'आरक्षणाची गरज' भासणार नाही आणि त्यांचे प्रतिनिधित्व संस्थेच्या स्वाभाविक रचनेचा भाग बनेल.

न्यायालये समाजाला न्याय देतात; पण न्यायाची मूल्ये त्या संस्थांच्या स्वतःच्या व्यवहारातही दिसली पाहिजेत. कायद्याच्या पुस्तकात समानता लिहिणे सोपे आहे; ती संस्थेच्या खुर्चीत बसवणे कठीण.

एएडब्ल्यूआयने अखेर त्या दिशेने एक पाऊल टाकले आहे. १६२ वर्षांचा इतिहास बदलण्यास सुरुवात झाली आहे. आता प्रश्न एवढाच—ही सुरुवात किती संस्थांपर्यंत पोहोचते?

# हडपसर दारुकांडातील आरोपी जेरबंद

## सीआयडी आणि उरुळी कांचन पोलिसांची संयुक्त कारवाई

डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज
developednationslaw@gmail.com

**पुणे :** हडपसरमधील विषारी दारुकांडाप्रकरणी फरार असलेला दत्ता उर्फ भावड्या भिमराव लोंढे याला सीआयडी पुणे आणि उरुळी कांचन पोलिसांच्या संयुक्त पथकाने राजेवाडी (ता. पुरंदर) येथे ताब्यात घेतले. पोलिसांच्या माहितीनुसार, वेशांतर करून तसेच वाहनाची क्रमांकपट्टी बदलून पसार होण्याच्या तयारीत असताना सापळा रचून ही कारवाई करण्यात आली.

हडपसर पोलीस ठाण्यातील गुन्हा क्रमांक ३७९/२०२६ आणि दापोडी पोलीस ठाण्यातील गुन्हा क्रमांक ११४/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहितेतील कलम १०५, १२३ आणि १२५ अन्वये दाखल गुन्ह्यात लोंढे हा वॉन्टेड आरोपी होता. विषारी दारू सेवनाच्या घटनेत २२ जणांचा मृत्यू झाल्याचा उल्लेख पोलिसांच्या तपासातील प्रकरणात आहे. या घटनेनंतर लोंढे फरार असल्याचे वृत्तात नमूद करण्यात आले आहे.

लोंढे शिंदवणे आणि शिंदवणे घाट परिसरात वेशांतर करून फिरत असल्याची माहिती सूत्रांकडून पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. त्याची ओळख पटविल्यानंतर त्याला उरुळी कांचन पोलीस ठाण्यात आणण्यात आले.

उरुळी कांचन पोलीस आणि सीआयडी पुणे यांनी संयुक्तपणे कारवाई केली. ताब्यात घेतलेल्या लोंढेला पुढील तपासासाठी सीआयडी पुणे पथकाचे प्रमुख डी. वाय. एस. पी. शामराव काळे यांच्या पथकाकडे सोपविण्यात आले आहे.

पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंग गिल, सीआयडी पुणेचे पोलीस अधीक्षक शफकत अमना, अप्पर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार आणि दौंड विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी बापूराव दडस यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

# 'आरोग्य आधी'चा मंत्र; आनंदी जीवनाचा रोडमॅप : ॲड. सोळुंके

डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज
developednationslaw@gmail.com



**पुणे :** "निरोगी व्यक्ती ही निरोगी समाजाची पायाभरणी आहे. त्यामुळे आरोग्याला जीवनातील सर्वोच्च प्राधान्य देणे ही काळाची गरज आहे," असा सूर Health to Happiness: A Holistic Wellness Guide to Living Strong, Happy, Medicine Free in Every Moment या ॲड. कविता एन. सोळुंके लिखित पुस्तकाच्या प्रकाशन कार्यक्रमात व्यक्त करण्यात आला.

अखंड धावपळ, वाढता ताण, प्रक्रियायुक्त अन्न आणि डिजिटल उपकरणांचा अतिवापर यामुळे आरोग्याच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असताना, आरोग्याकडे सर्वंकष दृष्टिकोनातून पाहण्याचा प्रयत्न या पुस्तकातून करण्यात आला आहे. भावनिक, शारीरिक, मानसिक, आध्यात्मिक आणि डिजिटल आरोग्य या पाच अंगांचा समतोल साधत निरोगी जीवनशैली कशी विकसित करता येईल, याचे मार्गदर्शन पुस्तकात करण्यात आले आहे. पुस्तकात भावनिक खाण्याची कारणे, अन्नाच्या प्रलोभनामागील मानसशास्त्र, पोषण, झोप, व्यायाम, ताणनियंत्रण, स्क्रीन टाइम आणि डिजिटल सवयी यांचा व्यावहारिक पद्धतीने विचार करण्यात आला आहे. Craving Management Worksheet, दैनंदिन व साप्ताहिक आरोग्य ट्रॅकर तसेच कृती आराखड्यांच्या माध्यमातून वाचकांना स्वतःच्या सवयी समजून घेऊन त्यात टप्प्याटप्प्याने बदल करण्याची दिशा देण्यात आली आहे.

### कार्यक्रमाला मान्यवरांची उपस्थिती

या पुस्तकाला सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्न बी. वराले, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि करवीर पीठाचे जगद्गुरू शंकराचार्य यांनी प्रस्तावना लिहिली आहे. त्यांच्या प्रस्तावनांमधून आरोग्य, सामाजिक जीवन आणि आध्यात्मिकतेतील परस्परसंबंध अधोरेखित करण्यात आला आहे.

कार्यक्रमाला न्यायमूर्ती प्रसन्न बी. वराले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, करवीर पीठाचे जगद्गुरू शंकराचार्य तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर, कायदेतज्ज्ञ, आरोग्य क्षेत्रातील व्यक्ती आणि पुस्तकप्रेमी उपस्थित होते. ॲड. कविता एन. सोलुंके यांनी पुस्तकामागील भूमिका स्पष्ट करताना आरोग्य हा 'नंतर पाहू' असा विषय न ठेवता तो दैनंदिन जीवनाचा केंद्रबिंदू करण्याचे आवाहन केले.

# "वैद्यकीय पुराव्यात तफावत; भोसरीतील आरोपीला जामीन"



डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज
developednationslaw@gmail.com

**पुणे :** भोसरी पोलिस ठाण्यात दाखल गंभीर गुन्ह्यात अटक करण्यात आलेल्या रवी बळीराम तेलंगे याला मुंबई उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला. मित्रांमधील वादातून घटना अचानक घडल्याचे प्रथमदर्शनी दिसते, तसेच घटनेमागे पूर्वनियोजन नसल्याचे आणि आरोपीची पूर्व गुन्हेगारी पार्श्वभूमी नसल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदविले.

भोसरी पोलिस ठाण्यात सी.आर. क्रमांक ५१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील कलम १०९, ११५(२), ११८(१), ३(५) आणि ३५२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. तेलंगे याला ४ फेब्रुवारी २०२६ रोजी अटक करण्यात आली होती. या प्रकरणातील जामीन अर्ज क्रमांक ३२६६/२०२६ वर न्यायमूर्ती मिलिंद एन. जाधव यांच्या न्यायालयात सुनावणी झाली.

जामीन अर्जावर सुनावणी करताना न्यायालयाने फिर्यादी किंवा प्रत्यक्षदर्शीच्या कथनातील बाबी आणि दुखापतीच्या ठिकाणाबाबत उपलब्ध वैद्यकीय पुराव्यात प्रथमदर्शनी तफावत असल्याचे नमूद केले. तसेच प्रकरणातील परिस्थिती, गुन्ह्याचे स्वरूप आणि आरोपीचा खटल्यापूर्वीचा कारावास लक्षात घेता जामीन देण्यासाठी योग्य प्रकरण असल्याचे न्यायालयाने म्हटले.

त्यानुसार तेलंगे याची १० हजार रुपयांच्या पीआर बाँडवर आणि तेवढ्याच रकमेच्या एका जामीनदारावर सुटका करण्याचे आदेश देण्यात आले.

जामिनाच्या अटींनुसार आरोपीने महिन्यातून एकदा तपास अधिकाऱ्यासमोर हजेरी लावावी, खटल्याच्या सुनावणीस सहकार्य करावे, संबंधित न्यायालयाची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय महाराष्ट्राबाहेर जाऊ नये, तसेच साक्षीदारांवर प्रभाव टाकू नये किंवा पुराव्यात हस्तक्षेप करू नये, असे निर्देश देण्यात आले आहेत.

आरोपीच्या वतीने ॲड. गौरव काकडे, ॲड. अल्पेश वेगड आणि ॲड. प्रदीप नाईक यांनी बाजू मांडली. न्यायालयाने स्पष्ट केले की, जामीन अर्जाच्या निर्णयावेळी केलेली निरीक्षणे ही केवळ त्या अर्जापुरती मर्यादित असून, मूळ खटल्याचा निर्णय उपलब्ध पुराव्यांच्या आधारे स्वतंत्रपणे घेतला जाईल.

# औषध विकले जाते; आरोग्याचा हिशेब कोण देणार?

## एक गोळी, अनेक प्रश्न : नफा, नियम आणि रुग्णाच्या हक्कांमधील वाढती दरी

**औषधाच्या एका गोळीवर किंमत छापलेली असते; पण तिच्या चुकीच्या वापराची किंमत पैशांत मोजता येत नाही. ती कधी आरोग्याची असते, कधी जीवाची आणि कधी संपूर्ण समाजाच्या भविष्यातील उपचारक्षमतेची! औषध म्हणजे केवळ बाजारातील वस्तू नाही. संशोधनापासून उत्पादनापर्यंत, परवान्यापासून विपणनापर्यंत आणि डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनपासून रुग्णाच्या हातात पोहोचेपर्यंत त्यामागे कायदेशीर जबाबदाऱ्यांची मोठी साखळी असते. या साखळीतील एका दुव्यानेही कायदा मोडला, तर त्याचा फटका थेट रुग्णाच्या आरोग्याला बसू शकतो.**

आजचा मूलभूत प्रश्न त्यामुळे केवळ ‘औषध सुरक्षित आहे का?’ एवढाच नाही. ते कोणी तयार केले, कोणी विकले, कोणाच्या सल्ल्याने दिले आणि त्याच्या चुकीच्या वापराची जबाबदारी कोणाची? हा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतो.

### ✦ कायदा आहे; मग अंमलबजावणी कुठे?

भारतात औषधांच्या उत्पादन, विक्री आणि वितरणासाठी Drugs and Cosmetics Act, 1940 आणि Drugs Rules, 1945 ही महत्त्वाची कायदेशीर चौकट आहे. औषधांची गुणवत्ता, सुरक्षितता आणि नियंत्रित विक्री हा या व्यवस्थेचा केंद्रबिंदू आहे.

विशेषतः Schedule H, H1 आणि X मधील औषधांच्या विक्रीवर विशिष्ट निर्बंध आहेत. त्यापैकी Schedule H1 मधील औषधांच्या विक्रीची नोंद ठेवण्याची स्वतंत्र व्यवस्था आहे. औषध कोणाला, कोणत्या प्रिस्क्रिप्शनवर आणि किती प्रमाणात दिले गेले, याचा मागोवा घेता यावा, हा त्यामागचा उद्देश. याचा साधा अर्थ असा—मेडिकल स्टोअर हा डॉक्टरांचा पर्याय नाही.

‘मागच्या वेळी हेच औषध घेतले होते’, ‘सर्दी झाली आहे’, ‘ताप आहे’, ‘घसा दुखतोय’ अशा कारणांवरून औषध देणे आणि वैद्यकीय निदान करणे या दोन भिन्न गोष्टी आहेत. फर्मासिस्टची भूमिका महत्त्वाची असली तरी ती डॉक्टरांच्या वैद्यकीय निर्णयाची जागा घेऊ शकत नाही.

अँटिबायोटिक : आजची सोय, उद्याचा धोका

या प्रश्नाचे गांभीर्य Antimicrobial Resistance (AMR) मुळे अधिक वाढते. अँटिबायोटिक्सचा अनावश्यक वापर, चुकीचा डोस किंवा वैद्यकीय सल्ल्याशिवाय सेवन केल्याने जंतूंमध्ये औषधांविरुद्ध प्रतिकारशक्ती निर्माण होण्याचा धोका वाढतो.

आज एखाद्या व्यक्तीने चुकीच्या पद्धतीने अँटिबायोटिक घेतले, तर त्याचा परिणाम केवळ त्या व्यक्तीपुरता मर्यादित राहू शकत नाही. भविष्यात काही संसर्गांवर प्रभावी औषधे कमी पडण्याची शक्यता निर्माण होते. म्हणजेच एका व्यक्तीचा चुकीचा औषधवापर सार्वजनिक आरोग्याच्या संकटाला हातभार लावू शकतो.

### ✦ रुग्णाला नुकसान झाले म्हणजे कंपनी दोषी?

इथे कायद्याचा आणखी एक सूक्ष्म पैलू समजून घ्यावा लागतो. Consumer Protection Act, 2019 अंतर्गत Product Liability ची तरतूद आहे. उत्पादनातील दोष, उत्पादन प्रक्रियेतील त्रुटी, निर्धारित निकषांपासून विचलन किंवा अपुरी सूचना अशा परिस्थितीत उत्पादक, विक्रेता किंवा सेवा पुरवठादाराविरुद्ध जबाबदारीचा प्रश्न निर्माण होऊ शकतो.



**ॲड. संदेश दराडे**
B.A., LL.B. |
LL.M. (London, UK)

मात्र, औषध घेतल्यानंतर प्रतिकूल परिणाम झाला म्हणजे औषध उत्पादक आपोआप दोषी ठरतो, असे नाही.

रुग्णाला आधीपासून असलेला आजार, इतर औषधांशी झालेली प्रतिक्रिया, चुकीचा डोस, ॲलर्जी किंवा अन्य वैद्यकीय कारणेही असू शकतात. त्यामुळे कायद्याचे उल्लंघन आणि वैद्यकीय नुकसान यांच्यातील कारणसंबंध स्वतंत्रपणे सिद्ध करावा लागतो. प्रत्येक चूक गुन्हा असतेच असे नाही

औषधविषयक कायद्याचे उल्लंघन झाले म्हणून प्रत्येक प्रकरणाला एकाच चौकटीत बसवता येणार नाही. परवाना, नोंदवही, प्रिस्क्रिप्शन, औषधाची गुणवत्ता, बनावट अथवा भेसळयुक्त औषध आणि अनधिकृत विक्री अशा प्रत्येक बाबीसाठी संबंधित कायदेशीर तरतुदी तपासणे आवश्यक आहे.

म्हणूनच ‘नियमभंग झाला म्हणजे थेट फौजदारी गुन्हा’ असा सरसकट निष्कर्ष काढण्याऐवजी कोणती तरतूद मोडली, परिस्थिती काय होती आणि त्याचे कायदेशीर परिणाम काय आहेत, हे पाहणे गरजेचे आहे.

### ✦ आरोग्य हा मूलभूत अधिकार

भारतीय संविधानातील अनुच्छेद २१ जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचे संरक्षण करतो. न्यायालयीन व्याख्यांमधून आरोग्याच्या अधिकारालाही व्यापक घटनात्मक संदर्भ प्राप्त झाला आहे. अनुच्छेद ४७ सार्वजनिक आरोग्य सुधारण्याबाबत राज्याला धोरणात्मक दिशा देतो.

त्यामुळे औषधांची गुणवत्ता, सुरक्षितता, उपलब्धता आणि प्रभावी नियमन हा केवळ प्रशासकीय विषय राहात नाही; तो सार्वजनिक आरोग्याच्या शासनव्यवस्थेचा अविभाज्य भाग बनतो. मात्र प्रत्येक औषधविक्रीतील त्रुटीला थेट अनुच्छेद २१ चे उल्लंघन म्हणता येणार नाही. परंतु एखाद्या भागात प्रिस्क्रिप्शनशिवाय नियंत्रित औषधांची सर्रास विक्री होत असेल, आवश्यक नोंदी ठेवल्या जात नसतील, वारंवार तक्रारी होत असूनही परवाने सुरू राहत असतील आणि तपासणी यंत्रणा निष्क्रिय असेल, तर प्रश्न एका मेडिकल स्टोअरपुरता राहत नाही.

तेव्हा प्रश्न राज्याच्या नियमन आणि अंमलबजावणीच्या जबाबदारीचा होतो.

### औषधांचा बाजार की आरोग्याचा व्यवहार?

फार्मास्युटिकल उद्योग संशोधन, रोजगार आणि आधुनिक वैद्यकशास्त्राच्या प्रगतीचा महत्त्वाचा आधार आहे. त्यामुळे ‘औषध उद्योग म्हणजे नफा कमावणारी व्यवस्था’ एवढेच चित्र रंगवणे अन्यायकारक ठरेल. पण आरोग्य आणि नफा यांच्यात संघर्ष निर्माण झाला, तर कायद्याच्या केंद्रस्थानी कोण असले पाहिजे?

### ✦ उत्तर एकच—रुग्ण.

याच संदर्भात Uniform Code for Pharmaceutical Marketing Practices, 2024 (UCPMP) महत्त्वाचा ठरतो. औषधांच्या प्रचारात वैद्यकीय व्यावसायिकांशी असलेले संबंध, भेटवस्तू, आर्थिक लाभ, आतिथ्य, नमुने, CME/CPD आणि प्रचारात्मक दावे याबाबत या चौकटीत नियम आहेत. कारण औषधांचा प्रचार हा साबण, कपडे किंवा इतर ग्राहक वस्तूंच्या जाहिरातीसारखा साधा व्यवहार नाही. प्रचाराचा थेट परिणाम डॉक्टरांच्या prescribing behaviour वर होऊ शकतो.

### ✦ जबाबदारीची साखळी कुठे तुटते?

औषध रुग्णापर्यंत पोहोचेपर्यंत उत्पादक–वितरक–घाऊक विक्रेता–फार्मसी–डॉक्टर–रुग्ण अशी मोठी साखळी कार्यरत असते. प्रत्येक टप्प्यावर स्वतंत्र कायदेशीर आणि व्यावसायिक जबाबदारी आहे. म्हणून औषधामुळे रुग्णाला हानी झाली, तर केवळ मेडिकल स्टोअरकडे बोट दाखवणे पुरेसे नाही. उत्पादकाची गुणवत्ता, वितरणातील नियम, विक्रीची पद्धत, डॉक्टरांचे प्रिस्क्रिप्शन, डोस आणि रुग्णाने औषध कसे घेतले—या सर्वांचा विचार करावा लागतो. Medical Negligence आणि Product Liability यांची सरमिसळ करणेही धोकादायक आहे. डॉक्टर किंवा रुग्णालयाने अपेक्षित उपचारमानक पाळले का, हा एक प्रश्न; तर उत्पादनात दोष होता का, हा दुसरा. एका प्रकरणात डॉक्टर, रुग्णालय, फार्मसी आणि उत्पादक यांच्या जबाबदाऱ्या वेगवेगळ्या असू शकतात.

### ✦ शेवटी प्रश्न एका गोळीचा नाही

भारताकडे औषधनियमनासाठी कायद्यांची कमतरता नाही. Drugs and Cosmetics Act, Drugs Rules, Pharmacy Act, Consumer Protection Act, Product Liability, UCPMP 2024 आणि घटनात्मक संरक्षण अशी विस्तृत चौकट उपलब्ध आहे.

### ✦ मग खरी समस्या कुठे आहे?

कायद्याच्या अभावात की अंमलबजावणीच्या अभावात? हा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. औषध उत्पादकाला व्यवसायाचा अधिकार आहे. विक्रेत्याला व्यापाराचा अधिकार आहे. डॉक्टरांना उपचार करण्याचा अधिकार आहे. रुग्णालाही उपचार मिळण्याचा अधिकार आहे. पण या सर्व अधिकारांच्या केंद्रस्थानी एकच जबाबदारी असली पाहिजे—रुग्णाच्या आरोग्याशी तडजोड न करणे. औषधाच्या पट्टीवर किंमत असते; पण रुग्णाच्या जीवाची किंमत नसते. म्हणून पुढच्या काळातील औषधनियमन केवळ ‘औषध विक्रीवर नियंत्रण’ ठेवणारे नसावे. ते औषधाच्या निर्मितीपासून रुग्णाच्या सुरक्षिततेपर्यंत प्रत्येक दुव्याला उत्तरदायी करणारे असले पाहिजे.

### ✦ कारण शेवटी—

औषध हा बाजारातील माल नाही;

तो रुग्णाच्या जीवाशी जोडलेला कायदेशीर आणि नैतिक विश्वास आहे.

# पाण्यासाठी वणवण; जलवाहिनी मात्र ‘गळती’च्या भरवशावर!

## महंमदवाडीतील संतापजनक चित्र; पाच-सहा ठिकाणी गळती, रस्ता निसरडा; तक्रारीनंतरही पालिका सुस्त

डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज
developednationslaw@gmail.com

**पुणे :** एकीकडे नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकावे लागत असताना दुसरीकडे महापालिकेच्या निष्काळजी कारभारामुळे हजारो लिटर पाणी अक्षरशः रस्त्यावर वाहून जात आहे. महंमदवाडी गावठाणातील मुख्य रस्त्यावर हनुमान मंदिर चौक ते उंड्री रस्त्यादरम्यान जलवाहिनीला पाच-सहा ठिकाणी गळती लागली असून, मोठ्या प्रमाणावर पाणी वाया जात आहे. गळतीचे पाणी रस्त्यावर साचल्याने रस्ता ओलसर आणि निसरडा झाला असून पादचारी तसेच दुचाकीस्वार घसरून अपघात होत असल्याची तक्रार उंड्री (ता. हवेली) ग्रामपंचायतीचे माजी सदस्य सुभाष घुले यांनी केली.

पाण्याचा प्रत्येक थेंब जपण्याचे आवाहन करणाऱ्या प्रशासनालाच मात्र स्वतःच्या जलवाहिनीतील गळती दिसत नसल्याचे चित्र आहे. उन्हाळ्यात आणि पाणीटंचाईच्या काळात नागरिकांना टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागते. अनेक भागांत पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांची धावपळ सुरू असताना, दुसरीकडे पालिकेच्या जलवाहिनीतून पाणी रस्त्यावर वाहत राहणे हा केवळ पाण्याचा अपव्यय नसून प्रशासनाच्या नियोजनशून्यतेचा नमुना असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांमधून व्यक्त होत आहे. गळतीमुळे रस्त्यावर सतत पाणी साचत असल्याने वाहतुकीलाही अडथळा निर्माण होत आहे. दुचाकीस्वारांना अचानक निसरड्या रस्त्याचा सामना करावा लागत असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. पाण्यामुळे रस्त्याची अवस्था आणखी खराब होण्याची शक्यताही आहे. म्हणजेच आज वाहून जाणारे पाणी उद्या रस्त्याच्या दुरवस्थेचे कारण ठरू शकते. नागरिकांकडून कर वसूल करणाऱ्या पालिकेला मात्र मूलभूत जलवाहिनीची गळती थांबविण्यासाठी वारंवार पाठपुरावा करावा लागतो, हीच प्रशासनाच्या कार्यक्षमतेची शोकांतिका आहे.



याबाबत पालिका पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्यात आली आहे. मात्र तक्रारीनंतरही अद्याप गळतीची दुरुस्ती करण्यात आलेली नाही, अशी माहिती उंड्रीचे माजी ग्रामपंचायत सदस्य सुभाष घुले यांनी दिली. नागरिकांच्या तक्रारींकडे तातडीने लक्ष देण्याऐवजी फाइल, पाहणी आणि कार्यवाहीच्या नावाखाली वेळकाढूपणा सुरू राहिला, तर पाण्याची समस्या सुटणार तरी कशी, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. एकीकडे पाण्यासाठी टँकर, दुसरीकडे रस्त्यावर पाण्याचे लोट; ही विसंगती केवळ महंमदवाडीची नाही, तर शहराच्या जलव्यवस्थापनावरच प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी आहे. पाणीटंचाईचे नियोजन करण्यापूर्वी उपलब्ध पाण्याची नासाडी थांबविणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. नागरिकांनी तक्रार करूनही गळती सुरूच राहणे म्हणजे समस्या माहिती असूनही उपाययोजना न करण्याचा प्रकार आहे. महापालिका प्रशासनाने तातडीने जलवाहिनीची दुरुस्ती करून पाण्याचा अपव्यय आणि अपघातांचा धोका थांबवावा, अशी मागणी उंड्री (ता. हवेली) ग्रामपंचायतीचे माजी सदस्य सुभाष घुले यांनी केली आहे.

## मटणाच्या हट्टावरून वाद; वडिलांच्या मारहाणीत मुलाचा मृत्यू

**पुणे :** श्रावणात मटणाचे कालवण करून देण्याचा हट्ट धरलेल्या दारूच्या नशेतील मुलाचा वडिलांशी झालेल्या वादानंतर मारहाणीत मृत्यू झाल्याचा धक्कादायक प्रकार वारजे माळवाडीतील रामनगर येथे घडला. महेश भागवत गायकवाड (४०) असे मृताचे नाव असून, याप्रकरणी त्याचे वडील भागवत सूर्यभान गायकवाड (६४) आणि आई पार्वती भागवत गायकवाड (६०) यांना वारजे माळवाडी पोलिसांनी अटक केली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, महेशला दारूचे व्यसन होते. सुमारे दहा वर्षांपूर्वी त्याचा विवाह झाला होता. मात्र, व्यसन आणि कामधंदा नसल्याने त्याचा घटस्फोट झाला होता. त्यानंतर तो एकटाच राहत होता आणि जेवणासाठी आई-वडिलांकडे जात होता. दारू पिऊन घरी येणे आणि मांसाहारी जेवणाची मागणी करण्यावरून त्याचे वडिलांशी वारंवार वाद होत होते.

सोमवारी रात्री साडेदहाच्या सुमारास महेश दारूच्या नशेत घरी आला. त्याने मटणाचे कालवण करून देण्याचा हट्ट धरला. मात्र, श्रावणामुळे घरात मांसाहार केला जात नसल्याचे आई-वडिलांनी सांगितले. त्यावरून वाद वाढला. त्यावेळी वडिलांनी महेशच्या तोंडावर आणि डोक्यावर मारहाण केल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासात समोर आले आहे.

**पहाटे प्रकार उघड :** भांडणाचा आवाज शेजारी राहणाऱ्या महेशचा भाऊ गणेश (३४) याला रात्री ऐकू आला. यापूर्वीही दोघांमध्ये वाद होत असल्याने त्याने त्याकडे दुर्लक्ष केले. पहाटे साडेचारच्या सुमारास आईने गणेशला महेश उठत नसल्याचे सांगितले. गणेशने त्याच्या डोक्याखाली हात घातला असता हाताला रक्त लागले. त्यानंतर महेशला रुग्णालयात नेण्यात आले; मात्र डॉक्टरांनी उपचारापूर्वीच त्याला मृत घोषित केले. या घटनेमागील नेमके कारण आणि मारहाणीमुळेच मृत्यू झाला का, याचा तपास वारजे माळवाडी पोलीस करीत आहेत.

**सर्व प्रकारच्या जाहीर सूचना/ वकील नोटीस आणि अन्य जाहिराती स्वीकारण्याकरिता**
**संपर्क : श्रेयश दहिवळ, मो. ९९२२४१२४५१**
**आॅफिस संपर्क : ०२०-२९९९ २५३०**

QR Code स्कॅन करा, पे करा.

**वर्गणीचे पर्याय** | स्वागत मूल्य : फक्त रु. १० एक वर्षासाठी रु. ५००

**रक्कम भरल्याची पेमेंट रिसीट, आपले नाव, पिनकोडसह पूर्ण पत्ता आणि मोबाईल नंबर : ९९२२४१२४५१ या क्रमांकावर मॅसेज करा!**

# आरोग्य ‘नंतर’ नाही; आत्ताच!

## औषधांच्या गोळ्यांपेक्षा जगण्याची पद्धत बदलण्याचा ‘हेल्थ टू हॅपिनेस’चा संदेश

**माणसाने विज्ञान जिंकले, तंत्रज्ञानाला आपल्या मुठीत घेतले, जगाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत क्षणात संवाद साधण्याची क्षमता मिळवली; पण स्वतःच्या शरीराशी आणि मनाशी संवाद साधण्याची कला मात्र हरवत चालली आहे. वेग, स्पर्धा, स्क्रीन, प्रक्रिया केलेले अन्न, अपुरी झोप आणि सततचा ताण यांच्यामध्ये आधुनिक माणूस जगतो आहे. आजार झाल्यानंतर आरोग्याचा विचार करण्याची आपली सवय इतकी पक्की झाली आहे की, ‘निरोगी कसे राहायचे?’ हा प्रश्न ‘आजारी पडल्यावर काय करायचे?’ या प्रश्नामागे पडला आहे.**

याच विसंगतीकडे लक्ष वेधणारे ॲड. कविता एन. सोलुंके यांचे ‘Health to Happiness – A Holistic Wellness Guide to Living Strong, Happy, Medicine Free in Every Moment’ हे पुस्तक आहे. मुंबई उच्च न्यायालयात अतिरिक्त सरकारी वकील म्हणून कार्यरत असलेल्या सोलुंके यांना दोन दशकांहून अधिक काळाचा कायदेविषयक अनुभव आहे. मध्यस्थ, लवादतज्ज्ञ आणि समेटतज्ज्ञ म्हणूनही त्यांनी काम केले आहे. मानवी संघर्ष, ताण, वर्तन आणि मानसिकतेचा जवळून आलेला अनुभव त्यांच्या आरोग्यविषयक मांडणीला वेगळे परिमाण देतो.

### ✦ आजाराशी लढण्याआधी सवयींशी लढा

आरोग्य म्हणजे आजार नसणे एवढीच मर्यादित संकल्पना नाही. मन, शरीर, भावना आणि अंतर्मन यांच्यातील समतोल म्हणजे आरोग्य, अशी व्यापक भूमिका या पुस्तकातून पुढे येते. आजच्या जगात ‘वेलनेस’ हा शब्दही बाजारपेठेचा भाग झाला आहे. डाएट, फिटनेस, ॲप्स, सप्लिमेंट्स आणि विविध आरोग्यविषयक उत्पादनांच्या गर्दीत माणूस पुन्हा एका नव्या उपभोगाच्या चक्रात अडकतो. मात्र आरोग्य विकत घेता येत नाही; ते रोजच्या जगण्यातून घडवावे लागते.

पुस्तकाची हीच भूमिका महत्त्वाची आहे. भावनिक, शारीरिक, मानसिक, आध्यात्मिक आणि डिजिटल आरोग्य या पाच परस्परांशी जोडलेल्या पैलूंच्या माध्यमातून संपूर्ण आरोग्याचा विचार करण्यात आला आहे.

आपण दुःखी असताना अधिक खातो का? कंटाळा आला की मोबाईल का हातात घेतो? ताण वाढला की झोप का बिघडते? एखाद्या अपयशानंतर आपण स्वतःशी कसे वागतो? या प्रश्नांची उत्तरे केवळ ‘इच्छाशक्ती कमी आहे’ एवढ्यावर थांबत नाहीत. आपल्या भावनिक आणि मानसिक स्थितीचा आहार, झोप, स्क्रीनटाइम आणि दैनंदिन सवयींवर परिणाम होत असतो.

म्हणूनच ‘क्रेव्हिंग’कडे केवळ अन्नाची इच्छा म्हणून न पाहता त्यामागचा भावनिक संकेत समजून घेण्याचा प्रयत्न पुस्तक करते.

### ✦ जिभेवर बाजाराचा कब्जा

आजच्या बाजारव्यवस्थेने माणसाच्या आहारावर मोठा प्रभाव टाकला आहे. प्रक्रिया केलेले अन्न, आकर्षक जाहिराती, सहज उपलब्ध होणारे जंक फूड आणि सतत काहीतरी खाण्याची संस्कृती यामुळे ‘आपण काय खातो?’ हा प्रश्न पुरेसा राहिलेला नाही; ‘आपण ते का खातो?’ हा प्रश्न अधिक महत्त्वाचा झाला आहे.

पुस्तक अन्नाच्या मोहामागील मानसशास्त्र समजून घेण्याचा प्रयत्न करते. पोषण, लेबल वाचन आणि रोजच्या छोट्या सवयी यांचा विचार करताना आरोग्याला कठीण नियमांच्या चौकटीत बंदिस्त न करता व्यवहार्य बनवण्याचा



प्रयत्न आहे.

आरोग्य म्हणजे रोज स्वतःला शिक्षा करणे नव्हे. ‘डाएट’ मोडला म्हणून अपराधी वाटून घेणेही नव्हे. उलट स्वतःच्या सवयी समजून घेऊन त्यात सातत्याने छोटे बदल घडवणे, हा अधिक टिकाऊ मार्ग ठरू शकतो.

### ✦ मन थकले तर शरीर किती धावणार?

आधुनिक आरोग्यव्यवस्थेत मानसिक आरोग्याविषयी चर्चा वाढली असली तरी प्रत्यक्ष जीवनात मनाच्या थकव्याकडे अजूनही दुर्लक्ष केले जाते. शरीराला ताप आला तर आपण विश्रांती घेतो; पण मन थकले तर त्याला विश्रांती देण्याऐवजी आणखी काम, आणखी स्क्रीन आणि आणखी धावपळ सुरूच राहते.

पुस्तक मानसिक आरोग्याला आरोग्याच्या केंद्रस्थानी ठेवते. ‘विलपॉवर’वर अवलंबून राहण्याऐवजी विचार करण्याची पद्धत, मर्यादित समजुती आणि दैनंदिन सवयी बदलण्याचा दृष्टिकोन त्यातून मांडला आहे. अपयश म्हणजे स्वतःला दोष देण्याचे कारण नसून पुढचा बदल घडवण्यासाठी मिळालेला अनुभव मानण्याची भूमिका त्यात दिसते.

ही भूमिका आजच्या तरुण पिढीसाठी विशेष महत्त्वाची आहे. सतत तुलना, यशाचे दडपण, सोशल मीडियावरील आभासी आयुष्य आणि प्रत्यक्ष जीवनातील असुरक्षितता यांच्यामध्ये ‘मी पुरेसा आहे का?’ हा प्रश्न अनेकांच्या मनात निर्माण होतो. मानसिक आरोग्याचा प्रश्न केवळ मानसोपचारतज्ज्ञांच्या दालनापुरता मर्यादित ठेवता येणार नाही; तो कुटुंब, शिक्षण, रोजगार, सामाजिक संबंध आणि डिजिटल संस्कृतीशीही जोडलेला आहे.

### ✦ स्क्रीन बंद झाली, तर मन सुरू होईल?

डिजिटल युगाने जगण्याची व्याख्याच बदलली आहे. मोबाईलशिवाय काही मिनिटे राहणे कठीण वाटते. काम संपले तरी स्क्रीन संपत नाही. झोपण्यापूर्वी फोन, उठल्यानंतर फोन आणि दिवसभर सतत सूचना. शरीर एका जागी असते; मात्र मन सतत एका स्क्रीनवरून दुसऱ्या स्क्रीनवर धावत असते.

यामुळे ‘डिजिटल हेल्थ’ हा आरोग्याचा स्वतंत्र घटक म्हणून समोर येतो. तंत्रज्ञानाचा त्याग नव्हे, तर त्याच्याशी आरोग्यदायी नाते निर्माण करणे आवश्यक आहे. डिजिटल मर्यादा, सजग तंत्रज्ञानवापर आणि वेळोवेळी ‘अनप्लग’ होण्याचे महत्त्व पुस्तक अधोरेखित करते.

हा मुद्दा केवळ व्यक्तिपुरता मर्यादित नाही. डिजिटल व्यसन, माहितीचा अतिरेक आणि सततच्या उत्तेजनामुळे समाजाच्या एकाग्रतेवर, संवादावर आणि भावनिक स्थैर्यावरही परिणाम होऊ शकतो. म्हणूनच डिजिटल आरोग्य ही भविष्यातील सार्वजनिक आरोग्याचीही मोठी चिंता ठरणार आहे.

### ✦ माहिती पुरेशी नाही; कृती हवी

आरोग्यविषयक पुस्तके वाचणाऱ्यांची कमतरता नाही; पण त्या माहितीचे आचरण करणाऱ्यांची संख्या कमी आहे. ‘काय करावे’ हे आपल्याला माहीत असते; प्रश्न असतो तो ‘दररोज कसे करावे?’ याचा.

याच ठिकाणी पुस्तकाचा कृतीकेंद्रित दृष्टिकोन लक्षवेधी ठरतो. ‘Craving Management Worksheet’, दैनंदिन व साप्ताहिक आरोग्य नोंदी आणि व्यावहारिक कृती आराखडे यांसारख्या साधनांच्या माध्यमातून वाचकाला स्वतःच्या सवयींचे निरीक्षण करण्यास प्रवृत्त केले जाते.

म्हणजेच आरोग्य हा वर्षाच्या पहिल्या दिवशी केलेला संकल्प नसून दररोज घेतलेला निर्णय आहे.

‘औषधमुक्त’ म्हणजे औषधांना नकार नव्हे

पुस्तकाच्या शीर्षकातील ‘Medicine Free’ हा शब्द आकर्षक आहे. मात्र त्याचा अर्थ वैद्यकीय उपचार किंवा औषधोपचार नाकारणे असा सरसकट घेणे योग्य ठरणार नाही. पुस्तकाचा भर प्रतिबंधात्मक, जीवनशैलीकेंद्रित आणि सजग आरोग्यदृष्टीवर आहे. दैनंदिन ताण, चुकीच्या सवयी, असंतुलित आहार आणि डिजिटल अतिरेक यांपासून स्वतःचे संरक्षण करण्याचा प्रयत्न त्यामागे आहे.

आधुनिक वैद्यकशास्त्राने लाखो जीव वाचवले आहेत. त्यामुळे औषधोपचाराची आवश्यकता असताना तो नाकारणे हा या पुस्तकाचा आशय मानता येणार नाही. उलट आजारी पडण्याची शक्यता कमी करण्यासाठी निरोगी जीवनशैली विकसित करणे हा त्याचा मुख्य संदेश अधिक सुसंगत ठरतो.

### ✦ आरोग्य ही वैयक्तिक नव्हे, सामाजिक जबाबदारी

निरोगी नागरिक ही कोणत्याही समाजाची संपत्ती असते. एखाद्या व्यक्तीचे आरोग्य बिघडले की त्याचा परिणाम केवळ त्या व्यक्तीवर होत नाही; कुटुंब, रोजगार, अर्थव्यवस्था आणि सार्वजनिक आरोग्यव्यवस्थेवरही होतो.

म्हणून आरोग्याचा प्रश्न ‘माझे शरीर, माझी जबाबदारी’ इतकाच मर्यादित ठेवता येणार नाही. शाळांमध्ये पोषण आणि मानसिक आरोग्य, कार्यालयांमध्ये काम-जीवन संतुलन, शहरांमध्ये चालण्यासाठी आणि व्यायामासाठी जागा, तसेच डिजिटल वापराबाबत सजगता—या सगळ्यांचा आरोग्याशी संबंध आहे.

याच व्यापक दृष्टिकोनातून Health to Happiness आरोग्याला दैनंदिन जीवनाच्या केंद्रस्थानी आणण्याचा प्रयत्न करते.

ॲड. सोलुंके यांच्या कायदेविषयक आणि मानवी वर्तनाशी निगडित अनुभवाचा हा लेखनप्रवास आहे. त्या कायद्याच्या क्षेत्राबरोबरच मध्यस्थी, शिक्षण आणि मानवी कल्याणाच्या क्षेत्रातही कार्यरत आहेत.

पुस्तकाला सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्न बी. वराळे, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि करवीर पीठाचे जगद्गुरू शंकराचार्य यांच्या प्रस्तावना लाभल्या आहेत.

मात्र कोणत्याही पुस्तकाची खरी कसोटी त्याला मिळालेल्या प्रस्तावनेत नसते; ते वाचकाच्या जगण्यात किती बदल घडवते, यात असते.

आज माणूस यशाच्या मागे धावताना आरोग्य गमावत आहे आणि नंतर तेच आरोग्य परत मिळवण्यासाठी पैसा, वेळ आणि आयुष्य खर्च करीत आहे. ही शर्यत कुठेतरी थांबवावी लागेल.

प्रश्न एवढाच—आपण आजारी पडल्यानंतर आरोग्य शोधणार आहोत की निरोगी असतानाच त्याची किंमत ओळखणार आहोत?

कारण पैसा गेला तर परत मिळू शकतो. पद गेले तर दुसरे मिळू शकते. नोकरी गेली तर नवी संधी मिळू शकते. पण शरीर आणि मनाची झालेली अपरिमित झीज परत मिळवणे नेहमी शक्य नसते. म्हणूनच आजची खरी गरज ‘आजारावर उपचार’ करण्यापेक्षा ‘आरोग्याची संस्कृती’ निर्माण करण्याची आहे.

आरोग्याला उद्यावर ढकलण्याची सवय सोडावी लागेल. कारण उद्याचे आयुष्य जगण्यासाठी आजचे शरीर आणि आजचे मन निरोगी असणे हीच पहिली अट आहे. ■■■

# विधी क्षेत्रातील महामेरू : निर्भय वकिलीचा राम जेठमलानी

## कायद्याच्या अक्षरापलीकडे न्यायाचा आत्मा शोधणाऱ्या वकिलाची अद्वितीय गाथा

**भारतीय विधिजगताच्या इतिहासात काही व्यक्ती केवळ यशस्वी वकील म्हणून नव्हे, तर एका मूल्यव्यवस्थेचे प्रतीक म्हणून ओळखल्या जातात. राम बुलचंद जेठमलानी हे त्यापैकी एक. बुद्धिमत्तेची धार, कायद्याचे सखोल ज्ञान, उलटतपासणीचे असामान्य कौशल्य आणि कोणत्याही दबावापुढे न झुकण्याचे धैर्य यामुळे त्यांनी भारतीय वकिलीवर अमीट ठसा उमटवला. त्यांची कारकीर्द ही केवळ प्रसिद्ध खटल्यांची यादी नाही; ती निर्भय वकिली आणि कायद्याच्या राज्यावरच्या अढळ विश्वासाची गाथा आहे.**

१४ सप्टेंबर १९२३ रोजी अविभाजित भारतातील सिंध प्रांतात जन्मलेल्या जेठमलानींची बौद्धिक चमक बालपणापासूनच दिसून आली. अल्पवयात शिक्षण पूर्ण करून त्यांनी वयाच्या १७ व्या वर्षी विधी पदवी मिळवली. वकिलीची सनद मिळविण्याच्या वयोमर्यादेचा अडथळा त्यांच्या वाटेत आला; पण त्यांनी तो स्वीकारला नाही. कायद्याच्या चौकटीत राहून त्यांनी त्या नियमाला आव्हान दिले आणि विशेष परवानगीने वयाच्या १८व्या वर्षी वकिलीला सुरुवात केली. अडथळा म्हणजे थांबण्याचे कारण नव्हे, तर कायद्याच्या माध्यमातून प्रश्न विचारण्याची संधी, हे त्यांच्या सुरुवातीच्या प्रवासातूनच दिसले.

कराचीतील वकिलीपासून सुरू झालेली कारकीर्द फाळणीच्या काळाने बदलून टाकली. भारतात आल्यानंतर हातात संपत्ती नव्हती; मात्र कायद्याचे ज्ञान आणि आत्मविश्वास होता. निर्वासितांच्या हक्कांसाठी त्यांनी न्यायालयीन लढा दिला. पुढे के. एम. नानावटी प्रकरणासह अनेक गाजलेल्या खटल्यांत त्यांनी आपली वेगळी छाप निर्माण केली.

जेठमलानींच्या वकिलीचे वैशिष्ट्य त्यांच्या पुराव्यांच्या अभ्यासात होते. साक्षीदाराच्या जबाबातील सूक्ष्म विसंगती शोधणे, कागदपत्रांचे बारकाईने विश्लेषण करणे आणि नेमक्या प्रश्नांनी विरोधी बाजूची भूमिका तपासणे, ही त्यांची खासियत होती. न्यायालयात आवाजाची उंची नव्हे, तर युक्तिवादाची गुणवत्ता महत्त्वाची असते, हे त्यांनी सिद्ध केले.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांत महत्त्वाचा पैलू म्हणजे लोकप्रियतेच्या दबावापासून स्वतंत्र राहण्याची वृत्ती. एखाद्या आरोपीविरोधात समाजमत तयार झालेले असले, तरी त्याला सक्षम कायदेशीर बचाव मिळणे हा त्याचा घटनात्मक अधिकार आहे, या भूमिकेवर ते ठाम राहिले. आरोपीचा बचाव करणे म्हणजे त्याच्या कथित गुन्ह्याचे समर्थन करणे नव्हे; तर न्यायप्रक्रियेचे संरक्षण करणे होय. हा धडा आजच्या काळात विशेष महत्त्वाचा आहे.



**ॲड. पल्लवी काळे**
मार्गदर्शक, 'डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज '

आज समाजमाध्यमांमुळे आरोप, प्रत्यारोप आणि 'तत्काळ न्याय' यांचे वातावरण क्षणार्धात तयार होते. न्यायालयाचा निकाल येण्यापूर्वीच एखाद्याला दोषी ठरवले जाते. अशा वेळी वकिलाची भूमिका जनमतामागे जाण्याची नसून कायद्याच्या बाजूने उभे राहण्याची असते. जेठमलानींची कारकीर्द या तत्त्वाची जिवंत आठवण करून देते.

१९७५ ची आणीबाणी त्यांच्या सार्वजनिक जीवनातील निर्णायक पर्व ठरले. बार कौन्सिल ऑफ इंडियाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी नागरिकांच्या स्वातंत्र्यावर आलेल्या संकटाविरोधात आवाज उठवला. लोकशाही केवळ निवडणुकांपुरती मर्यादित नसते; नागरिकांचे स्वातंत्र्य, कायद्याचे राज्य आणि स्वतंत्र न्यायव्यवस्था ही तिची मूलभूत शक्ती असते, हे त्यांनी अधोरेखित केले.

केंद्रीय कायदा व न्यायमंत्री म्हणूनही त्यांनी काम केले. बार कौन्सिल ऑफ इंडियाचे अध्यक्षपद त्यांनी अनेकदा भूषवले. विधी क्षेत्रातील संस्थात्मक प्रश्न, मानवी हक्क आणि न्यायव्यवस्थेतील सुधारणांबाबत त्यांनी सातत्याने भूमिका घेतली. त्यामुळे त्यांचे योगदान न्यायालयीन कामकाजापुरते मर्यादित राहिले नाही.

आजच्या नव्या पिढीतील विधी पदवीधरांसाठी जेठमलानींच्या जीवनाचा सर्वांत मोठा संदेश कोणता? वकिली ही



केवळ उपजीविकेची साधनव्यवस्था नाही; ती संविधान आणि न्यायव्यवस्थेप्रती असलेली जबाबदारी आहे. कलमांची माहिती असणे पुरेसे नाही; त्या कलमांमागील संविधानिक मूल्ये समजून घेणे आवश्यक आहे. तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल न्यायव्यवस्था यांचे युग आले असले तरी सखोल अभ्यास, तर्कशक्ती, पूर्वतयारी आणि नैतिक धैर्य यांना पर्याय नाही.

आज न्यायव्यवस्थेसमोर प्रलंबित खटले, न्याय मिळण्यास होणारा विलंब, न्यायालयीन खर्च आणि सामान्य नागरिकाचा न्यायव्यवस्थेपासून वाढणारा दुरावा अशी आव्हाने आहेत. अशा वेळी जेठमलानींच्या कारकिर्दीकडे केवळ भूतकाळ म्हणून पाहणे पुरेसे नाही. त्यांच्या निर्भयतेचा अर्थ वर्तमानात शोधावा लागेल.

कायद्यापुढे सत्ता मोठी नाही, जनमत न्यायालयापेक्षा मोठे नाही आणि लोकप्रियतेपेक्षा संविधान मोठे आहे, हा जेठमलानींच्या वकिलीचा गाभा होता. त्यांच्या स्मृतीला खरे अभिवादन म्हणजे त्यांच्या नावाचा गौरव करणे नव्हे; तर न्यायालयात उभे राहताना भीतीपेक्षा कायद्याला, लोकप्रियतेपेक्षा सत्याला आणि सोयीपेक्षा संविधानाला प्राधान्य देणे.

राम जेठमलानींची गाथा म्हणूनच संपलेली नाही. निर्भयपणे प्रश्न विचारणाऱ्या प्रत्येक वकिलाच्या आवाजात आणि न्यायासाठी लढणाऱ्या प्रत्येक युक्तिवादात ती पुढे चालू राहते.

# मनन मिश्रा यांच्या राजीनाम्याची मागणी

## नॅल्सार विद्यार्थ्यांच्या प्रकरणावरून एएडब्ल्यूआयची भूमिका; संस्थेच्या विश्वासार्हतेचा मुद्दा

डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज
developednationslaw@gmail.com

**मुंबई :** नॅल्सार, हैदराबाद येथील विधी विद्यार्थ्यांच्या प्रकरणावरून बार कौन्सिल ऑफ इंडियाचे अध्यक्ष मनन कुमार मिश्रा यांच्या भूमिकेबाबत निर्माण झालेल्या वादाची ॲडव्होकेट्स असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडिया (एएडब्ल्यूआय)ने दखल घेतली आहे. १३ ऑगस्ट रोजी जारी झालेल्या पत्रानंतर १५ ऑगस्टला मिश्रा यांनी माफी मागून संबंधित कार्यवाही बंद केली. मात्र, या प्रकरणामुळे संस्थेच्या विश्वासार्हतेबाबत प्रश्न उपस्थित झाल्याने त्यांनी पदाचा राजीनामा देण्याचा विचार करावा, अशी मागणी एएडब्ल्यूआयने केली आहे.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक भवितव्याशी संबंधित निर्णय घेताना नैसर्गिक न्याय, योग्य प्रक्रिया आणि संबंधितांना आपली बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक असल्याचे एएडब्ल्यूआयने निवेदनात म्हटले आहे. या तत्त्वांच्या पार्श्वभूमीवर १३ ऑगस्टच्या पत्रव्यवहारामुळे विधी क्षेत्रात चिंता निर्माण झाल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.

मिश्रा यांनी माफी मागून कार्यवाही मागे घेतली असली, तरी या प्रकरणाच्या हाताळणीबाबत निर्माण झालेले प्रश्न केवळ माफीने संपत नाहीत, अशी भूमिका एएडब्ल्यूआयने घेतली आहे. बार कौन्सिल ऑफ इंडियासारख्या नियामक संस्थेवरील विधी क्षेत्राचा विश्वास कायम राहणे आवश्यक असल्याचेही संघटनेने नमूद केले आहे.

दरम्यान, मिश्रा यांच्याबाबत करण्यात आलेल्या निधीच्या कथित गैरव्यवहाराच्या आरोपांचाही एएडब्ल्यूआयच्या निवेदनात उल्लेख आहे. या आरोपांबाबत कोणताही निष्कर्ष नोंदविण्याऐवजी त्यांची स्वतंत्रपणे योग्य त्या पद्धतीने पडताळणी होणे आवश्यक आहे. मात्र, नॅल्सार प्रकरण आणि संस्थेच्या विश्वासार्हतेबाबत निर्माण झालेल्या प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर नेतृत्वाने नैतिक जबाबदारी स्वीकारावी, अशी संघटनेची भूमिका आहे.

पदावरील व्यक्तीपेक्षा संस्थेची विश्वासार्हता महत्त्वाची असल्याचे सांगत, मिश्रा यांनी पदाचा राजीनामा दिल्यास सध्याच्या वादातून संस्थेला बाहेर पडण्यास आणि विधी क्षेत्राचा विश्वास दृढ करण्यास मदत होईल, असे एएडब्ल्यूआयने म्हटले आहे.

# पैशाने मैत्री तुटली; १० वर्षांनी पुन्हा गळाभेट

## वकिलांच्या मध्यस्थीने ४.८५ लाखांचा वाद अडीच लाखांत मिटला

डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज
developednationslaw@gmail.com

**पुणे :** पैशाच्या व्यवहारातून तुटलेली जिवलग मैत्री तब्बल दहा वर्षांनी पुन्हा जुळली. ४ लाख ८५ हजार रुपयांच्या उसने व्यवहारावरून न्यायालयात पोहोचलेला वाद दोन्ही बाजूंच्या वकिलांनी मध्यस्थी करून अडीच लाख रुपयांत मिटविला. न्यायालयीन संघर्ष संपल्यानंतर दहा वर्षांपासून अबोल असलेल्या दोन मित्रांनी पुन्हा एकमेकांची गळाभेट घेतली.

अनिल आणि सुनील (नावे बदलली आहेत) हे वाहन खरेदी-विक्रीच्या व्यवसायात असून, त्यांची नऊ-दहा वर्षे घनिष्ठ मैत्री होती. सुनीलचे गॅरेजही होते. व्यवसायात आर्थिक अडचणी आल्याने त्याने मित्र अनिलकडे मदत मागितली. मैत्रीवरील विश्वासापोटी अनिलने जून आणि जुलै २०१५ मध्ये बँकेतून पैसे काढून सुनीलला ४ लाख ८५ हजार रुपये उसने दिले. दोन-तीन महिन्यांत रक्कम परत करण्याचे आश्वासन देण्यात आले होते.

मुदत उलटूनही पैसे परत न मिळाल्याने अनिलने पैशांची मागणी केली. त्यानंतर



(संग्रहित)

जानेवारी २०१६ मध्ये सुनीलने ४ लाख ८५ हजार रुपयांचा राष्ट्रीयीकृत बँकेचा धनादेश दिला. मात्र खात्यात पुरेशी रक्कम नसल्याने धनादेश अनादरित झाला. त्यानंतर वाद न्यायालयात पोहोचला.

१६ मार्च २०१६ पासून सुरू झालेला हा न्यायालयीन संघर्ष तब्बल दहा वर्षे सुरू राहिला. पैशांच्या व्यवहाराने केवळ कायदेशीर वादच निर्माण केला नाही, तर दोन जिवलग मित्रांमधील संवादही संपला.

### वकिलांनी जोडला मैत्रीचा दुवा

न्यायालयीन सुनावणीदरम्यान दोन्ही बाजूंच्या वकिलांनी वादापेक्षा मैत्री वाचवण्याला प्राधान्य दिले. फिर्यादीचे वकील ॲड. परीक्षित बडे आणि आरोपीचे वकील ॲड. सुधीर मुळे यांनी दोन्ही मित्रांमध्ये संवाद घडवून आणला. चर्चा आणि परस्पर संमतीनंतर दोन्ही पक्षांनी तडजोडीचा निर्णय घेतला.

अखेर ४ लाख ८५ हजार रुपयांच्या व्यवहारावर अडीच लाख रुपयांत समझोता झाला आणि दशकभराचा न्यायालयीन वाद संपुष्टात आला. त्यानंतर दोन्ही मित्र पुन्हा एकत्र आले. पैशांचा हिशेब अडीच लाखांत मिटला; पण दहा वर्षांनी परत मिळालेली मैत्री मात्र अनमोल ठरली.

# ध्वनिप्रदूषणावरून पुणे पोलीस आयुक्तांविरुद्ध अवमान याचिका

डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज
developednationslaw@gmail.com

**पुणे :** शहरातील ध्वनिप्रदूषण रोखण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांची अंमलबजावणी करण्यात पुणे पोलिसांकडून कथित कसूर होत असल्याचा आरोप करीत पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्याविरुद्ध मुंबई उच्च न्यायालयात अवमान याचिका दाखल करण्यात आली आहे. अवमान याचिका (एसटी) क्रमांक १९०५६/२०२६ २७ ऑगस्ट रोजी दाखल करण्यात आली.

अखिल भारतीय ग्राहक पंचायत, भारतीय मजदूर संघ, पुणे जिल्हा सीएचएस अँड अपार्टमेंट्स फेडरेशन, पुणे जिल्हा रिटेल व्यापारी संघ, श्री स्वामी समर्थ सहकारी संस्था आणि ज्येष्ठ नागरिक विलास लेले यांनी ही याचिका दाखल केली आहे. याचिकाकर्त्यांच्या वतीने अ‍ॅड. सत्या मुळे यांनी बाजू मांडली आहे. याचिकेत मुंबई उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्रमांक १९१/२०२३ मध्ये २० ऑगस्ट २०२४ रोजी दिलेल्या निर्देशांचा संदर्भ देण्यात आला आहे. ध्वनिप्रदूषण नियंत्रणासाठी न्यायालयाने दिलेल्या बंधनकारक निर्देशांची पुणे पोलिसांकडून प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला आहे. पोलिस आयुक्तांवर शहरातील कायदा व सुव्यवस्था तसेच ध्वनिप्रदूषणासंदर्भातील नियमांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी असल्याचेही याचिकेत नमूद करण्यात आले आहे.

गणेशोत्सव, विविध धार्मिक सण, राजकीय कार्यक्रम, मिरवणुका आणि अन्य सार्वजनिक कार्यक्रमांच्या काळात पुण्यासह राज्यातील अनेक शहरांमध्ये मोठ्या आवाजातील ध्वनिवर्धकांचा वापर होत असल्याचा आरोप याचिकाकर्त्यांनी





केला आहे. २०२३ ते २०२५ या कालावधीतील गणेशोत्सवांमध्ये ध्वनिप्रदूषणाबरोबरच लेझर किरणांच्या वापराबाबतही गंभीर तक्रारी झाल्याचे याचिकेत नमूद करण्यात आले आहे.

ध्वनिप्रदूषणाच्या तक्रारींसाठी नागरिकांकडून पोलिसांकडे संपर्क साधला जात असतानाही अपेक्षित कारवाई होत नसल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे. काही प्रकरणांत राजकीय दबावामुळे नियमांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचा आरोपही करण्यात आला आहे. मात्र, या आरोपांची स्वतंत्र न्यायालयीन पडताळणी अद्याप झालेली नाही.

### ‘धर्माच्या नावाखाली कायदे मोडता येत नाहीत’

धार्मिक सण साजरे करणे हा प्रत्येकाचा अधिकार असला, तरी कोणत्याही धर्माला कायद्याचे उल्लंघन करण्याची मुभा नाही, अशी भूमिका अ‍ॅड. सत्या मुळे यांनी याचिकाकर्त्यांच्या वतीने मांडली आहे. ध्वनिप्रदूषणाचे नियम हे सर्व धर्म, संस्था आणि व्यक्तींना समानपणे लागू होतात. त्यामुळे न्यायालयाच्या आदेशांची अंमलबजावणी करताना कोणताही भेदभाव होऊ नये, अशी मागणी याचिकेत करण्यात आली आहे.

### उत्सवकाळात ध्वनी पातळीचे मोजमाप

आगामी सणासुदीच्या काळात विविध स्वयंसेवी संस्था आणि याचिकाकर्ते वैज्ञानिक उपकरणांच्या साहाय्याने ध्वनीची पातळी मोजणार असल्याचे याचिकेत म्हटले आहे. नियमांचे उल्लंघन आढळल्यास त्याची माहिती न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात येईल, असेही नमूद करण्यात आले आहे. ध्वनिप्रदूषणाचा प्रश्न हा केवळ उत्सव किंवा धार्मिक स्वातंत्र्याचा नसून नागरिकांच्या आरोग्य, शांततेचा आणि कायद्याच्या समान अंमलबजावणीचा असल्याचा याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद आहे. न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करणे ही संबंधित यंत्रणांची कायदेशीर जबाबदारी असून, त्यात कसूर झाल्यास न्यायालयीन हस्तक्षेपाची मागणी करता येते, असा मुद्दा याचिकेत उपस्थित करण्यात आला आहे.

### आयुक्तांची बाजू अद्याप स्पष्ट नाही

दरम्यान, या अवमान याचिकेतील आरोपांवर पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार किंवा पुणे पोलिसांची अधिकृत भूमिका या माहितीत उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे याचिकेत करण्यात आलेले आरोप हे न्यायालयीन निर्णय होईपर्यंत आरोप म्हणूनच पाहणे आवश्यक आहे.

# विकसित राष्ट्राचा खरा पाया अर्थव्यवस्था नव्हे, कायद्याचे राज्य!

‘विकसित राष्ट्र’ म्हटले की डोळ्यांसमोर उभ्या राहतात त्या उंच इमारती, वेगवान रेल्वे, अत्याधुनिक तंत्रज्ञान, भरघोस दरडोई उत्पन्न आणि जागतिक बाजारपेठेवर प्रभाव टाकणाऱ्या कंपन्या. पण राष्ट्राच्या विकासाची खरी परीक्षा या बाह्य झगमगाटात नसते. एखाद्या सामान्य नागरिकाला न्याय किती सहज मिळतो, कर भरल्यानंतर त्याला शासनाकडून किती विश्वासार्ह सेवा मिळतात, कायद्यापुढे श्रीमंत-गरीब समान आहेत का आणि संस्थांवर नागरिकांचा विश्वास किती आहे. या प्रश्नांची उत्तरे त्या राष्ट्राच्या विकासाची खरी उंची ठरवतात.

म्हणूनच भारताने ‘विकसित भारत’ होण्याचे स्वप्न पाहताना केवळ आर्थिक महासत्ता होण्याचा ध्यास पुरेसा नाही. कायद्याचे राज्य हे विकसित राष्ट्राचे कणा आहे, ही जाणीव धोरणांच्या केंद्रस्थानी आली पाहिजे.

इतिहास याची साक्ष देतो. रोमन साम्राज्याने रस्ते, जलवाहिन्या, व्यापार आणि प्रशासनाची भव्य व्यवस्था उभी केली; परंतु साम्राज्याच्या वैभवाइतकीच त्याची कायदेव्यवस्थाही प्रभावी होती. इंग्लंडमध्ये मॅग्ना कार्टाने १२१५ मध्ये राजसत्तेलाही कायद्याच्या चौकटीत आणण्याची कल्पना रुजवली. पुढे लोकशाहीच्या विकासाबरोबर ‘कोणीही कायद्यापेक्षा मोठा नाही’ हा विचार आधुनिक राज्यव्यवस्थेचा पाया बनला.

भारताचा इतिहासही या बाबतीत समृद्ध आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात राज्यकारभार, महसूल, व्यापार, प्रशासन आणि न्यायव्यवस्थेचा सखोल विचार आढळतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यकारभारात प्रजाहित, शिस्त, महसूलव्यवस्था आणि प्रशासनाला असलेले महत्त्व आजच्या सुशासनाच्या संकल्पनांशी संवाद साधणारे आहे. भारतीय राज्यघटनेने या परंपरेला आधुनिक लोकशाही मूल्यांची जोड दिली. त्यामुळे ‘कायद्याचे राज्य’ ही भारतासाठी बाहेरून आयात केलेली संकल्पना नाही; तिची मुळे आपल्या राजकीय आणि बौद्धिक परंपरेतही खोलवर आहेत.



अ‍ॅड. विशाल विजयकुमार काळे
मुख्य मार्गदर्शक

मात्र आजचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा आहे. डिजिटल अर्थव्यवस्था, कृत्रिम बुद्धिमत्ता, क्रिप्टोकरन्सी, सीमापार गुंतवणूक, डेटा आणि सायबर गुन्हे यांनी पारंपरिक कायद्यांच्या सीमा बदलल्या आहेत. गुन्हेगार एका देशात बसून दुसऱ्या देशातील नागरिकाला फसवू शकतो; पैसा काही सेकंदांत एका खंडातून दुसऱ्या खंडात जाऊ शकतो; परंतु तपास यंत्रणेला अजूनही राष्ट्रीय सीमांच्या चौकटीत काम करावे लागते. त्यामुळे भविष्यातील विकसित राष्ट्राची कसोटी केवळ ‘किती तंत्रज्ञान?’ अशी नसून ‘तंत्रज्ञानाच्या वेगाशी कायदा किती वेगाने जुळवून घेतो?’ अशी असेल. याच ठिकाणी जागतिक इतिहास आपल्याला महत्त्वाचा धडा देतो. औद्योगिक क्रांतीने उत्पादन वाढवले; परंतु कामगारांचे हक्क, सामाजिक सुरक्षा आणि नियमन यांना कायदेशीर आधार मिळाल्यानंतरच आधुनिक कल्याणकारी राज्यव्यवस्थेचा विकास झाला. विसाव्या शतकात जागतिक व्यापार वाढला, पण त्यासोबत आंतरराष्ट्रीय नियमांची गरज निर्माण झाली. समुद्र, व्यापार, पर्यावरण, मानवी हक्क आणि युद्धाच्या नियमांपासून ते आजच्या डिजिटल डेटापर्यंत—जागतिक व्यवहार वाढला की नियमांची गरजही वाढते. आंतरराष्ट्रीय कायद्याच्या विकासात विकसनशील आणि विकसित राष्ट्रांमधील हितसंबंधांचा संघर्षही सातत्याने दिसतो.

भारतासाठी ही चर्चा विशेष महत्त्वाची आहे. १९९१ नंतरच्या आर्थिक उदारीकरणाने भारताला जगाच्या बाजारपेठेशी अधिक घट्ट जोडले. त्यानंतर भारतीय कंपन्या जागतिक झाल्या, परदेशी गुंतवणूक वाढली आणि व्यापाराचे स्वरूप बदलले. पण अर्थव्यवस्था जागतिक झाली असताना कायदेशीर आणि नियामक चौकटही तितकीच सक्षम झाली पाहिजे. अन्यथा विकासाचा वेग वाढेल; पण त्यासोबत आर्थिक फसवणूक, सायबर गुन्हे, करचुकवेगिरी, डेटा गैरवापर आणि नियमनातील पळवाटा यांचाही विस्तार होईल.

विकसित राष्ट्र म्हणजे ‘मोठी अर्थव्यवस्था’ नव्हे; ती ‘विश्वासाची अर्थव्यवस्था’ असते. गुंतवणूकदाराला कराराची अंमलबजावणी होईल, नागरिकाला न्याय मिळेल, उद्योजकाला नियम आधीच स्पष्ट असतील आणि शासनाचा निर्णय मनमानीऐवजी कायद्यावर आधारित असेल—तरच देशात दीर्घकालीन आर्थिक विश्वास निर्माण होतो. कायद्याचे राज्य आणि प्रभावी करार अंमलबजावणी हे आर्थिक विकासासाठी महत्त्वाचे घटक असल्याचे विविध विकासविषयक अभ्यासांतही अधोरेखित झाले आहे. यामुळे भारताच्या ‘विकसित भारत’ संकल्पनेत न्यायव्यवस्थेतील प्रलंबित खटले, पोलिस तपासाची गुणवत्ता, करारांची अंमलबजावणी, प्रशासकीय पारदर्शकता, नियामक संस्थांची स्वायत्तता आणि नागरिकांचा कायद्यावरील विश्वास या विषयांना आर्थिक विकासाइतकेच महत्त्व द्यावे लागेल.

जगात अनेक देश आर्थिकदृष्ट्या समृद्ध झाले; पण संस्थात्मक कमकुवतपणामुळे त्यांची प्रगती अस्थिर ठरली. उलट काही राष्ट्रांनी मर्यादित नैसर्गिक साधनसंपत्ती असूनही मजबूत संस्था, शिक्षण, कायद्याचे राज्य आणि प्रशासनिक शिस्त यांच्या जोरावर दीर्घकालीन प्रगती साधली. त्यामुळे ‘आपल्याकडे किती पैसा आहे?’ या प्रश्नापेक्षा ‘आपल्या संस्थांवर किती विश्वास ठेवता येतो?’ हा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतो.

आज भारताची लोकसंख्या, बाजारपेठ, तंत्रज्ञानक्षमता आणि उद्योजकता जगाचे लक्ष वेधून घेत आहे. पण या सामर्थ्याला संस्थात्मक स्थैर्याची जोड मिळाली तरच त्याचे रूपांतर शाश्वत विकासात होईल. आगामी काळात भारताला केवळ जगातील मोठी अर्थव्यवस्था व्हायचे नाही; जगासाठी विश्वासार्ह कायदेशीर आणि व्यावसायिक परिसंस्था निर्माण करणारे राष्ट्र व्हायचे आहे. भारतीय न्यायव्यवस्था, संसद, नियामक संस्था, पोलिस, प्रशासन, उद्योग आणि नागरिक समाज या सर्वांनी त्यात आपापली भूमिका बजावली पाहिजे.

कारण शेवटी विकसित राष्ट्राची ओळख विमानतळांच्या भव्यतेने होत नाही. ती होते—न्यायालयाच्या दारात उभ्या असलेल्या शेवटच्या नागरिकाला न्याय मिळतो की नाही, यावर.

श्रीकांत यांच्या दृष्टिकोनातून पाहिले तर ‘विकसित भारत’ ही केवळ २०४७ची आर्थिक लक्ष्यरेषा नसून कायद्याने सुरक्षित, संस्थांनी सक्षम आणि नागरिकांच्या विश्वासावर उभे राहणारे राष्ट्र घडविण्याची ऐतिहासिक संधी आहे.

इतिहासाने साम्राज्यांचे वैभव पाहिले आणि त्यांचा अस्तही पाहिला. आज भारतासमोर सामर्थ्यवान अर्थव्यवस्था उभी करण्याची संधी आहे. पण त्या अर्थव्यवस्थेला दीर्घायुष्य द्यायचे असेल तर तिच्या पायाभरणीत एकच वीट सर्वांत मजबूत असली पाहिजे.

### ✦ कायद्याचे राज्य

आणि कदाचित विकसित राष्ट्राच्या प्रवासातील सर्वांत महत्त्वाचा प्रश्नही हाच असेल-

भारत श्रीमंत केव्हा होईल, यापेक्षा भारतावर जगाचा आणि स्वतःच्या नागरिकांचा विश्वास किती दृढ होईल?

NATARAJ REALTY
Nataraj Realty
CIVIL ENGG. & CONTRACTORS
PROMOTERS & BUILDERS
Vikram Agarwal B.E. Civil
+91 9766532648
1041, Nataraj Court, Shukrawar Peth, Pune - 411 002
vikrammittal5006@gmail.com www.natarajrealty.com

Registration for Periodicals Title “Developed Nations Law News” vide PRGI Registration No. MHMUL/25/A0594. Printed by Shree Samarth Printers, Published by Sanjay Raghunath Sapkale on behalf of Sanjay Raghunath Sapkale, printed at Pune and published at C - 205, Fortune Empress Society, Haandewadi Road, Autade Haandewadi, Haveli, Hadapsar. Resident Editor : Dr. Ashok Tukaram Balgude, Managing Editor : M J Srikant.